# संगीत

# रामराज्यवियोग

लेखक
कै. अण्णासाहेब किर्लोस्कर

संगीत सौभद्र व संगीत शाकुंतल इत्यादि नाट्कांचे कर्ते

व

श्रीयुत चिंतामण गणेश कोल्हट्कर

संगीत ‘पूर्णावतार संगीत गोतास काळ

संगीत् वेड्यांचा बाजार अंक तिसरा

इत्यादि नाट्कांचे कर्ते

**विशेष धन्यवाद : श्री. पंढरीनाथ कोल्हापुरे**

दुर्मीळ पुस्तक व त्यावरील हक्क उपलब्ध करून दिल्याबद्दल.

**टंकनः- श्रीमती प्राजक्ता चांपनेरकर**

**मुद्रित शोधनः- कु. राहुल प्रकाश सुवर्णा**

**अनुक्रमणिका**

अंक पहिला - पान नं. 03

अंक दुसरा - पान नं. 20

अंक तिसरी - पान नं. 34

अंक चौथा - पान नं. 52

अंक पाचवा - पान नं. 69

**श्रीरामचंद्रप्रसन्न**

# संगीत रामराज्यवियोग

**पद** - (राग अरबी, ताल धुमाळी)

**सांब सुराभरणा॥ आधीं॥ नमितों तव चरणा॥धृ॥ विघ्नतमा जो दिनमणि केवळ॥ करितों मग गणपतिच्या स्मरणा॥ सांब.॥ रामकथा पाकीं॥ जडले॥ बहु कवि परि तिस कीं॥ आणी या लोकीं॥ पहिला॥ कविवर वाल्मीकी॥ तत्पद सेवुनि बलवत्कवि या संगीताची करितो रचना॥ सांब सुरा॥1 ॥**

**पद** - (अतिपावन जें रामचरित्र या चा)

**अर्धांगीकृतनारि सदाशिव देउ तुम्हां शिव तो॥**
**जगदंबा पार्वतिमुख पाहुनि मोहुनि जो जातो॥ अर्धां॥**
**निजसिंहासनि स्त्रीतें बसवुनि नृत्यचि जो करितो॥2 ॥**
**स्वस्वरुपीं रत असुनि सदा कधिं ऐसी कृति करितो॥3 ॥**

**सूत्रधार -** पुरे पुरे, समाजनांला कंटाळा येण्याइतकें ईश्वरभजन करुन उगीच वेळ घालविण्यांत अर्थ तो काय! (पडद्याकडे पाहून आपल्याशीं) काय? तिला मी लवकर येण्याविषयीं सांगितलें असता अद्याप ती नाहीं आली? छे! छे!? ती कशाची येते. माझी फजिती झाली म्हणजे जिला आनंद होतो ती समयीं सहाय्य कशाची करणार आहे? धिक्कार असो अशा स्त्रियांना आणि त्यांवर आसक्त होण्या-या पुरुषांना -

**साकी**

**नाहिं दया शांतीजल हृदयी मत्सरखरविष भरलें।**
**अशा स्त्रियांच्या नादी लागुनि अजवरी बहु जन फसले॥**
**नच सावध होती॥ दीपिं पतंगापरि पडती॥**1 ॥

असो. निमंत्रण करुन जमविलेल्या या समाजनांस आपलें खरे दुःख सांगितलें असता ते काहीं रागावणार नाहींत उलटी दयाच करतील. (उघड) नवनाटकदर्शनलोलुप महारसिक सभाजनहो -

**बलवत्कविकृत रामराज्यसंवियोग बघण्या जमलां॥**
**प्राचीनापरि अर्वाचीना कविला बहु मानाला॥**
**देतां पाहोनी॥ होतो मज बहु तोष मनीं॥**1 ॥

परंतु काय करावे? ऐन समयाच्या वेळेस माझी स्री रुष्ट होउन कोठें गेली तें काहीं कळ्त नाहीं., तर तिचा मी शोध करीपर्यंत आपण आपल्या कौतुकाचा भंग न होऊं देतां किंचित कालपर्यंत स्वस्थ बसा. पहा, मी तिला आतां हुड्कून काढितों. बहुशः ती या सरयूतीराच्या उपवनांत कोठें तरी असेल. (इकडे तिकडे हिंडून निरखून पाहून) ही पहा माझी प्रिया. बागेंतील कलिंग वृक्षास टेकून उभी आहे . असो, आतां ही आपल्याशीं काय बोलत आहे तें ऐकू. (तदनंतर कलिंग वृक्षास टेकून उभी आहे अशी नटी प्रवेश करिते.)
नटी - (रागानें) धिक्कार असो आमच्या या स्त्रीजातीला -

**पद** (कोन गली गये शाम या चालीवर)

**व्यर्थ आम्ही अबला॥ खचित बाई॥ व्यर्थ्॥धृ॥**
**वागविती नर पशुसम आम्हां॥ मान नसे कसला॥ ख॥**1 ॥
**स्वातंत्र्याचा लेश नसे कधीं॥ बंदिवास ठरला॥ख॥**2 ॥
**नरनारी सम शास्त्र म्हणे परि॥ अनुभव नच आला॥**3 ॥

**सूत्रधारः** (जवळ जाऊन) प्रिये, आज काय हा प्रकार मांडला आहेस? तुझें भाषण मीं सर्व ऐकिलें, पहा -

**साकी**

**तिळही नसे स्वातंत्र्य तुम्हां तो इतका अनर्थ लोकी॥**
**असतें ते तरि काय घडत तें वदवेना ते मज की॥**
**आहे तेंच बरें॥ भरलें तव मन अविचारें॥**1 ॥

**नटीः** आम्हांला स्वतंत्रता तुम्ही देत नाहीं म्हणूनच आपण म्हणतां ते अनर्थ होतात. पुरुषांप्रमाणे स्रियांनाही स्वतंत्रता असती तर इतके अनर्थ होतेचना समजलांत!

**सूत्रधारः** बरें तें राहूं दे. प्रिये, असा कलह करण्याचा हा कां समय आहे? माझ्या निमंत्रणावरुन हे महारसिकजन आज आपल्या येथे आले आहेत. तर यांचें समाधान तूं केलें पाहिजेस.

**नटीः** (कपाळाला आंठया घालून) आम्हांला आपल्या आज्ञेंत वागलेंच पाहिजे. कोणत्या रितीनें समाधान करावयाचें त्याची आज्ञा करावी.

**सूत्रधारः** सभाजनांच्या तृषितकर्णोंस तुझ्या या सुरस गायनानें शांत कर म्हणजे झालें.

नटीः बरें तर या वर्षाकालाला अनुसरुनच गातें.

**पद** (पंचकल्याणी घोडा अबलक या चा)

**सुटला पितृदिशेचा वारा॥ झांकी मेघ नभपथ सारा॥**
**घन गर्जति तोफेपरी वर्षती गारा॥**
**कडकडाट करिती विजा येति जलधारा॥**1 ॥
**भरलीं तुडुंब वापीतळीं॥ न्हाले पर्वत नवघन जळीं॥**
**नदनदिला आले पूर सुतरुवर समुळीं॥**
**उपटुनिया पडले उलटे रुतले गाळीं॥**2 ॥
**जिकडे तिकडे जलमय असे॥ जंगल सर्वहि हिरवें दिसें॥**
**दृष्टिला सुंदर कुसुमें परि वास नसे॥**
**पतिवियुक्त वधु अति दीना वियोग विलसे॥**3 ॥
**राजा वसंत जणु मृत झाला॥**

**ग्रीष्म किं तापवि सकल जगाला॥**
**हा प्रावृट नच जननेत्रां पूरची आला॥**
**रडवीतो तैसा वर्षे स्वाश्रुजलाला॥4 ॥**

**सूत्रधारः** शिव शिव! प्रिये, असे अमंगल का गायन करावयाचें? स्मशानातील बकुल वृक्षाचीं पुष्पे जशी त्याज्य तद्वत तुझे वर्णन जरी गोड स्वरांनीं भरलेलें आहे, तरी त्यांतील अर्थ या रामराज्याभिषेकसमयीं अगदीं योग्य नाहीं.

**नटीः** (कलिंग वृक्षास टेंकून उभी राहून डोळे वटारुन) आग् लागोरे त्या रामाच्या राज्याला आणि अशीं द्वाड अक्षरें उच्चार करणा-या त्या तुझ्या वाणीला. (पाय जमिनीवर आपटते.)

सूत्रधारः (घाबरुन) अरेरे, काय हें लचांड तरी! आज हिला उन्मत्तवायु झाला किं काय? (तिच्या खांद्यावर हात टाकून) प्रिये, असे काय बडबडतेस? काय झाले तरी काय आज तुला?

**नटीः** (हात झिडकारुन) खबरदार, माझ्या शरीरास स्पर्श करशील तर.

**सूत्रधारः** खचित इच्या अंगांत पिशाचाचा संचार झाला असावा. नाहींपेक्षा श्रीरामाचें नाव ऐकतांच हिच्या देहाचा संताप झाला नसतां. अहाहा! उदयिक त्या रघुकुलतिलकास राज्याभिषेक होणार म्हणून जिकडे तिकडे किती आनंद झाला आहे.

**दिंडी.**

**नाहीं झाला होणारहि कधींही॥**
**असा उत्सव जन करितीआज पाही॥**
**खिन्न मुख तें नच दिसें आज कोठें॥**
**तुझी कृति ही पाहोनि नवल वाटे॥1 ॥**

आणखी प्रिये, तुझें हें क्रूर भाषण जर कोणी सरकारी मनुष्यानें ऐकिलें तर तुझ्या जिव्हेचे शतधा तुकडेच होतील.

**नटीः** (आवेशानें) अरे जा, महाराजांची अत्यंत आवड्ती जी माझी स्वामिनी तिचा पुत्र राज्याधिकारी असतां तुझ्या त्या भिकारडया रामाला राज्याभिषेक, मी जिवंत आहे तोंपर्यंत कधीं होऊं देणार नाहीं.(अंगात आल्यासारखें करुन किंकाळी फोड्न)

**पद** (सवाई)

**रामासि अनुकूल असती त्यांचे पाडिन दांत तरीच खरी मी॥**
**मंत्रीजन कुलगुरु यांचा तो मोडिन बेत तरिच खरी मी॥ कैकयी**
**वळवुनि तिजकरिं भूपा व्यसनी घालिन तरिच खरी मी॥ रामा**
**वन भरता सिंहासन देइन जाण तरिच खरी मी॥1 ॥**

**सूत्रधारः** (दचकून आपल्याशीं) हा समजलो. रामाला राज्याभिषेक झाला असतां रावणादिकांचा वध होऊन आपण बंधमुक्त होणार नाहीं, म्हणून देवांनीं कलीची योजना केली असतां त्यानें कलिंग वृक्षाचा आश्रय करुन संनिध आली जी मंथरा तिच्या देहांत प्रवेश केला. तर तें पात्र माझ्या प्रियेनें घेतलें असल्यामुळे तद्रुप होऊन सांप्रत ही अशी बोलत आहे. असो. (उघड) हा दुष्टे, काळतोंडे मंथरे, तुझ्या या क्रूर कृत्याबद्दल चंद्रार्क आहेत तोंपर्यंत लोक तुझी निंदाच करतील. थांब, चांडाळणी, तुझी खोड मोडायला मलाही पण दशरथच झाले पाहिजे. (असें म्हणून निघून जातो.)

**(ही प्रस्तावना झाली)**

मंथराः (दाण दाण पाय आपटून आपल्याशीं)
**रामासि अनुकूल असती त्यांचे पाडीन दांत तरीच खरी मी॥**
**मंत्रीजन कुलगुरु यांचा तो मोडिन बेत तरिच खरी मी॥ कैकयी**
**वळवुनि तिजकरिं भूपा व्यसनीं घालिन तरिच खरी मी॥ रामा**
**वन भरता सिंहासन देइन जाण तरिच खरी मी॥1 ॥**

सारें खरें., पण माझा हा बेत सिद्धीस जाणार तरी कसा? माझ्या मनाप्रमाणें गोष्ट घड्न येण्याला किती तरी प्रतिबंध आहेत पहा-

**पद** - (परिणिलें न मुनिकन्येला या चा)

**नृपममता रामावरती॥ प्राणाहुनि बहु आहे ती॥ कसें करूं॥**
**गुरु मंत्रिहि बहु मानीती॥ सकलांची रामीं प्रीती॥ कसें करूं॥**
**सिंहासन ज्येष्ठाहातीं॥ ऐसीं तीं शास्त्रें रडतीं॥ कसें करूं॥**
**चाल॥ निर्दया॥ नव्हे कैकया॥ राघवीं दया॥ अमित ती करिती॥**
**तशि नाहीं अपुल्या भरतीं॥ कसें करूं॥1 ॥**

तर मग कांहीं होणें नाहीं म्हणून स्वस्थ बसावयाचें? छे छे, ही गोष्ट प्राण गेला तरी घडणार नाहीं., त्या मेल्या रामाचा मला तिटकाराच आहे आणि तोही सर्वांशी ममतेनें वागून मला पाहिले की, कपाळास आठयाच घालतो -

**पद** - (रुचती का तीर्थयात्रा या चा)

**ओळखते लहान होता मी तेव्हांपासुनी॥**
**भरतासी कलह करी तो ताडी मी जाणुनी॥**
**कागाळी लटकि सांगे कौसल्येलागुनी॥**
**निष्ठुर ती शब्द मातें बोले कीं खोंचुनी॥1 ॥**

माझ्या सर्व उडया काय त्या कैकयीच्या जिवावर आणि त्याही पण महाराजांची अत्यंत प्रीति तिजवर आहे म्हणून, पण अलीकडे त्यांचाही पूर्वीप्रमाणे लंपटपणा तेथे दिसत नाहीं, ठीकच आहे -

**अंजनीगीत.**

**प्रिय सीतोदक निदाघकालीं॥ क्षुधा जठरी तरी अन्नें रुचलीं॥**
**नृपचित्तातें तैसी झाली॥ वृद्धपणी रमणी॥1 ॥**

सारांश, ज्या विषयी विचार करावा तें प्रतिकूलच दिसत आहे, माझ्या मनाला उमेद येईल असे एकही पुढें येत नाहीं -

**पद** - (माझे रुदय पोळत या चा)

**नाहिं सुगति भासत॥ काहीं न सुचत॥**
**विफल दिसत सर्व कीं मला॥**
**कार्यभार बहुत थोर मी तर उचलीला॥धृ॥**
**बलसागर ते रिपु असती मी तर अशि अबला॥**
**मज कोणि नसे सुविचार पुसायाला॥**
**या कृत्या अवकाशहि तो अल्पचि कीं उरला॥**
**नाहीं, जवळिं पाहि, भरत तोहि, राज्य हरायाला ॥1 ॥**

तर अशा ह्या अडचणीच्या प्रसंगीं बिनतोड कल्पना निघाली पाहिजे. (विचार केलासें करुन आनंदानें टाळ्या वाजवून) अहाहा! हें मात्र माझ्या शत्रूंच्या सर्व कल्पनाशस्त्रावर ब्रह्मास्त्रच सुचलें -

**पद** - (काय मला भूल पडली या चा.)

**पूर्ण दैव कैकयिचें खचित उदेलें॥**
**भरता सिंहासन ते आज लाधलें॥धृ॥**
**पूर्वि देवदैत्यासमर थोर माजलें॥**
**कैकयिसह दशरथासि सुयश साधलें॥**
**त्या समयीं भूपतिनें दोन वर दिले॥**
**अद्यापी ते तैसे बाकि राहिले॥ पूर्ण॥1 ॥**

झालें. ते दोन वर कैकयीनें मागून घ्यावे. एका वरानें भरतास राज्य व दुसया वरानें रामास अरण्य. (मोठयानें खदाखदा हांसून) मी खरोखर निष्काळजी झालें., आता मघाचे ते शब्द उघडपणे म्हणायला मला काहीं शंका वाटत नाहीं.

**पद** (सवाई)

**रामासि अनुकूल असती त्यांचे पाडिन दांत तरीच खरी मी॥**
**मंत्रीजन कुलगुरु यांचा तो मोडिन बेत तरिच खरी मी॥**
**कैकयी वळवुनि तिजकरीं भूपा व्यसनीं घालिन तरिच खरी मी॥**
**रामा वन भरता सिंहासन देइन जाण तरीच खरी मी॥1 ॥**

(इकडे तिकडे पाहून) या अयोध्येंतील लोक किती तरी मूर्ख आहेत. रामाला राज्याभिषेक होणार म्हणून काय मेले नाचत आहेत पहा! पण अरे मूर्खानों, जोपर्यंत त्याच्या हातीं अधिकार आला नाहीं तोंपर्यंतच तुम्हांला तो गरीब दिसत आहे. मी त्याला पूर्णपणे जाणत आहें -

**पद** - (वाहवा थोर तू भूपाला या चां.)

**धेनुमुखी हा व्याघ्रचि किंवा मधुमुख विषघट समजा॥**
**अनुभव येतां रडाल मग कीं आतां यातें उमजा॥**
**पोशिल भरतचि तुम्हांला॥ जरि तो राज्यपदीं बसला॥1 ॥**

(इतक्यांत रागावलेला रक्षक प्रवेश करतो.)

**नगररक्षकः** काय ए गर्भदासी? तुला आपल्या देहाचा कंटाळा आला असावा असें दिसतें, अगे त्या रामभद्राचा द्वेष करणारी या असंख्य प्रजाजनांत तू एकच मला दिसतेस. ठीकच आहे.

**पद** (बाबानों द्या सोडोनी या चा.)

**सकलांसी रवि प्रिय असतां घूकातें दुःसह होतो॥**
**राकाशशि सुखदचि सर्वां परीक्षा चोरा आवडेना तो॥**
**श्रीदत्तनाम ऐकुनियां थरकांप पिशाचा येतो॥चा॥**
**ज्वरितासि ससितपय जैसें॥ सतिचरित्र असतिस तैसें॥**
**विषयांधा विचार न दिसे॥ पातकिनर पुण्यपथा तो॥**
**रघुकुलमणि पावन रामा निंदिसि तू कुत्सितकामा॥1**

**मंथराः** (डोळे लाल करुन अंगावर जाऊन) अरे जा तीन कवडीच्या किंमतीच्या शिपुरड्या, मला तू ओळखत नाहींस काय? अरे, रावास रंक व रंकास राव एका क्षणांत करण्याचें सामर्थ्य जिला आहे व महाराजांजी अत्यंत आवडती अशी जी कैकयी महाराणी तिचाही कान धरण्याचा अधिकार जिला आहे ती मी मंथरा. तर हातांतील शस्त्र खालीं ठेवून या माझ्या पायांवर नाक घासून चुकलों म्हणशील तरच वांचशील, नाहींपेक्षां तू आपल्या जिवास मुकलास समज.

**नगररक्षकः** (खड्ग उपसून) अग ए राक्षसिणी! तू मंथरा ऐस किंवा साक्षात कैकयी ऐस., श्रीरामनिंदा जर तुझ्या मुखातून पुनः निघाली, तर तात्काळ तुझे शतशः तुकडे तुकडे करुन टाकीन. मग महाराजानीं जरी मला सुळावर चढविलें तरी मी मोठया आनंदानें चढेन, समजलीस.

**मंथराः** (किंचित घाबरुन आपल्याशीं) हा शुद्ध रानटी मनुष्य दिसतो, तेव्हा आपण कमजास्त भाषण केलें तर हा बोलल्याप्रमाणें करील यांत संशय नाहीं तर आता येथें राहून फळ नाहीं. लवकर कैकयीची भेट घेऊन आपला हेतु पूर्ण करावा. (असें म्हणून निघून जाते.)

**नगररक्षकः** हा दुष्टे, श्रीरामविमुखे, पळुन गेलीस म्हणूनच वाचलीस. असो. आपण आपलें काम करावे. श्रीवसिष्ठगुरुमहाराजांच्या आज्ञेवरुन या होणा-या नवीन राज्याभिषेकाबद्दल लोक काय म्हणतात हें गुप्तपणें ऐकण्याकरितां आपण तर सर्व शहरभर संचार केलाच., परंतु या नीच मंथरेवाचून आपणास काही प्रतिकूलता दिसली नाहीं. तर हें वर्तमान त्यांस कळवून मोकळें व्हावें. (पडयाकडे पाहून) अरे, हा गुरुमहाराजांच्या तैनातीस असणारा, त्याच्या अत्यंत प्रीतींतला व माझा जिवलग मित्र उन्नत इकडे येत आहे, तर त्याची भेट घेऊन नंतर जावे.

(नंतर उन्नत प्रवेश करितो.)

**उन्नतः** मित्रा विनता, तू आज रिकामासा?

**विनतः** दिसण्यांत रिकामा खरा पण मोठया महत्त्वाच्या कामावर आहे.

**उन्नतः** अशा कोणत्या महत्त्वाच्या कामावर आहेस हें मला सांगण्यासारखें असेल तर सांग.

**विनतः** मित्र, तुझा कान कर पुढें म्हणजे सांगतों.

(त्याच्या कानांत सांगतों.)

**उन्नतः** असें, गुरुमहाराजांचा केवढा धूर्तपणा हा! शाबास राजास गुरु असावा तर असाच असावा. काय सांगू मित्रा, आतांशा गुरुमहाराजांना स्नानसंध्या करण्याला देखील वेळ मिळत नाहीं. सर्वकाळ या राज्याभिषेकासंबंधी त्यांचा विचार चाललेला असतो. रात्रींदेखील विश्रांति नाहीं. वरचेवर त्यांच्या मुखांतून असे उदगार येतात कीं, एकदां माझ्या रामचंद्रास राज्याभिषेक झाला म्हणजे मी कृतकृत्य झालो.

**विनतः** ते सारे खरे, पण द्वाड मंथरा कशी खवळुन गेली आहे. ती कोणत्या वेळेस काय विघ्न करील हें कळणार देखील नाहीं., कारण तिचें वर्चस्व फार नाजूक ठिकाणीं आहे.

**उन्नतः** (अवज्ञेनें) जाऊं दे रे, अशा बटकीच्या पोरीच्या हातून राज्याची उलटापालट होणार आहे? –

**साकी**

**कोठें श्रीगुरु वसिष्ठ तैसे कुशल सुमंतहि मंत्री॥**
**उच्छिष्ठा खावुनि सोकलि ती कोठें नीचा धात्री॥**
**व्यर्थचि बडबडती॥ आहे काय तिच्या हातीं॥1 ॥**

**विनतः** पण गडया, इतक्यां गडबडीने तूं कोणीकडे गेला होतास?
**उन्नतः** अरे तुला नाहीं का ठाऊक., स्वामी रामचंद्र महाराजांची स्वारी आज सूर्योदयींच मोठया गडबडीनें गेली ती अद्याप आली कीं नाहीं हे पहाण्याकरितां मला पाठविलें होतें.
**विनतः** काय रामचंद्र महाराजांची स्वारी गडबडीनें बाहेर गेली आहे? मला हें ठाऊकच नव्हतें. इतक्या गडबडीनें स्वारीं जाण्याचें कारण तुला ठाऊक आहे काय?
**उन्नतः** अरे, माहीत नसायला काय झाले? ही गोष्ट आबालवृद्धांस समजली असून तुला कसें कळलें नाही हें कळत नाहीं.
**विनतः** अरे, मी आपल्या नेमलेल्या कामांत गुंतून गेलों असल्यामुळें हे मला समजलें नाहीं.
**उन्नतः** बरें ऐक, आपल्या नगरांतील वीतिहोत्र ब्राम्हणाचा मुलगा अल्पायुषी मरण पावला. तेव्हां असे हें होणारें कृत्य राज्यांत कांहीं पापाचरण झाल्यांवाचून व्हावयाचें नाहीं., म्हणून त्या ब्राम्हणानें आपल्या पुत्राचें शव राजद्वारी ठेवून मोठा आक्रोश करुन सांगितलें कीं, अरे, तुझ्या राज्यांत कांहीं अघोर पातक घडत आहे. त्यामुळें माझा पुत्र माझ्यादेखत मरण पावला. तर तसें पाप कोण करीत आहे त्याचा शोध करुन त्यास जेव्हां दंड करशील तेव्हां माझा हा पुत्र पुनः जिवंत होईल आणि असें न घडेल तर तुला मी शाप देईन.
**विनतः** अरेरे! काय तरी चांडाळ हे? एकूण राज्य करणारावर केवढी तरी जोखीम असते.
उन्नतः त्या प्रसंगीं मित्रा -

**साकी**

**दीन वदन भूपतिनें केलें गुरुमंत्रिहि घाबरले॥**
**धनुर्बाण सरसाउनि तेव्हां रामलक्ष्मण उठले॥**

**पितरां वंदोनी॥ निघाले स्वरथीं बैसोनी॥**1 **॥**

तेव्हा तिकडून अद्याप परत आले कीं नाहीं हे पाहण्याकरितां मला पाठविलें होतें पण अद्यापि स्वारी आली नाहीं.

**विनतः** अहाहा! असें तें पातक कोण करीत आहे. याचा पत्ता काढून त्यास पकडून जर स्वामी रामचंद्र परत विजयी होऊन आले तर काय सांगूं मित्रा, रामराज्याभिषेक न व्हावा म्हणून म्हणणारे जे असतील त्यांच्या तोंडावर पालथा पायपोस मारल्यासारखे होईल.

**उन्नतः** (त्याच्या हातावर टाळी देऊन) अरे, तसें होणारच. बरें चल जाऊं दे, मला बराच उशीर झाला.

**विनतः** अरे चल, गुरुमहाराजांस मी ऐकिलेलें व पाहिलेलें सर्व वर्तमान सांगण्याकरितां मलाही तिकडेच यावयाचें आहे. (असें म्हणून दोघे जातात.)

**हा विष्कंभक झाला.**

(तदनंतर न्यायासनावर बसलेला वसिष्ठ व पुढें उभा असलेला मंत्री सुमंत आणि परिमित सेवक असे प्रवेश करितात.)

**वसिष्ठ -**

**पद** (जाती नगरमे या चा.)

**पाहिन सिंहासनिं राम कधीं ही॥**
**उत्कंठा मनिं लागली॥धृ॥**
**शामसुंदर तनुवरी नृपमण्डन धनुर्बाण करिं शोभती॥**
**रतिहूनि सुंदर सीता जवळीं राजश्री पदिं गुंतली॥पाहि॥**
**कनक दंडधर बंदीजन ते रघुकुलकीर्तनिं गुंतले॥**
**गायन नर्तन मंगल वाद्यें बधिर सुरश्रुति जाहली॥पा॥**
**मांडलिक नृप समुकुट निजशिर कमलीं पदनख पूजिती॥**
**या हस्तें अभिषेक किं होतां नभिं सुरदुंदुभिवाजती॥पा॥**

**सुमंतः** गुरुमहाराज, उदयीक गुरुपुष्यावर राज्याभिषेक व्हावयाचा आणि अद्याप सामग्री काय पाहिजे याची आज्ञा झाली नाहीं.

**वसिष्ठः** अहो दिवाणजी, तुमच्या हातून कितवा हा अभिषेक, याचा विचार करा. जसा मी यांचा कुलगुरु तसेच तुम्हालाही कुलमंत्री म्हटलें तरी चालेल.

**सुमंतः** आपण म्हणतां ते कदाचित खरेंही असेल. जवळ न मिळणारे पदार्थ चतुःसमुद्रांचें आणि गंगादि महानद्यांचें उदक सुवर्णकलशांत भरुन ठेविलेलें संग्रहीं आहे. पण आणखी काय काय पदार्थ पाहिजेत त्यांची आज्ञा आपल्या मुखानें झाली म्हणजे बरें.

**वसिष्ठः** बरे तसे होइना. ऐका -

**पद** - (निबिड कुंज गुजांत या चा.)

**सिंहासनि बैसेल रघूवर छत्र सुधवलांबरीं॥**
**द्यावें सौमित्राच्या करीं॥**
**शस्त्राभरणे मंडित सेना सेनापति त्यावरी॥**
**असावे सिद्ध मुख्य गोपुरीं॥**
**सुवर्णश्रृंगी वृषभ पाहिजे पुच्छ नखें ज्यावरी॥**
**असो तें व्याघ्रचर्म तव करीं॥**
**पटटावरि रघुपतिची पूजा मांडलीक नृपवरीं॥**
**करावी धन अर्पुनि सादरीं॥**
**चाल॥ श्रृंगारि नगर तोरणें ध्वजा लावुनी॥**
**द्विज सुखवावे मिष्टान्ना संतर्पुनी॥**
**ठायीं ठायिं चतुष्पथिं मंडप ते घालुनी॥**
**चाल॥ ग्रामदेवता तुष्ट कराव्या बलि अर्पुनि नागरी॥**
**करावा उत्सव आपुल्या घरीं॥**1 ॥

**सुमंतः** (हात जोडून) हें सर्व अक्षरशः ध्यानांत ठेवून तदनुसार सर्व तयारी ठेवितों.

**वसिष्ठः** आणखी राज्याभिषेकाच्या पूर्व दिवशीं म्हणजे आज श्रीरामभद्रानें पुण्याहवाचन करुन अभिषेकांग होम करुन उपोषण केलें पाहिजे व ब्रम्हचर्यव्रतानें राहून आज रात्रौ एकाकी स्थंडिलावर शयन केलें पाहिजे.

**सुमंतः** युवराजास ही आज्ञा आपण स्वतःच केली पाहिजे.

**वसिष्ठः** रामलक्ष्मणांची स्वारी विजयी होऊन परत आली कीं नाहीं हे पाहण्यास मीं उन्नतास पाठविलें आहे., अद्यापि तो काहीं परत आला नाहीं. स्वारी आली असें कळतांच मला स्वतः तिकडे जाऊन हें सर्व कळविलें पाहिजे.

(इतक्यांत उन्नत प्रवेश करितो.)

**उन्नतः** (उभयतांस मुजरा करुन हात जोडून) महाराज, स्वारी अद्यापि आली नाहीं.

**वसिष्ठः** काय अद्याप परत आले नाहींत? बरें, तू तेथेंच ऐस. स्वारी येतांच मी तिकडे आल्यावांचून स्नान करुं नये असें सांगून, मला कळविण्यास अगदी त्वरेनें ये.

**उन्नतः** (लवून) आज्ञा (असें म्हणून मुजरा करुन निघून जातो.)

**वसिष्ठः** अहो सुमंत, आज सकाळपासून मला एक मोठी काळजी लागली आहे.

**सुमंतः** (घाबरुन) गुरुमहाराज, अशा आनंदाच्या प्रसंगी आपण काळजी कसली म्हणतां?

**वसिष्ठः** काय सांगूं -

**पद** - (अर्जुन तर संन्यासी होऊन या चा.)

**रामराय राज्याचा स्वामी शास्त्रानें ठरला॥**
**अभिषेकोत्सव जाणुनि जनही आनंदें भरला॥**
**निजसिंहासन द्याया भूपति सिद्ध असे झाला॥**
**तिन्ही नृपजायांचा त्यातें रुकारही पडला॥**
**आप्तइष्ट अनुमोदन देती मी तर कीं पहिला॥**
**सौमित्रादिक भ्रातेही अनुकूलची रामाला॥1 ॥**

**सुमंतः** मग काळजी ती कसली?

**वसिष्ठः (चाल)**

**परि नीच मंथरा खवळुनि गेली असे॥**
**रामाच्या उदयें तिजला भरलें पिसें॥**
**तद्देहीं कलिचा पूर्ण वास तो असे॥**
**चा॥ कैकयीच्या मानसिं भरविल ती दुष्ट मत्सराला॥**
**नकळे मग तो काय अनर्थचि होईल तें मजला॥1 ॥**

**सुमंतः** गुरुमहाराज, मंथरा इतकी बिघडून गेली हें आपणांस कसें कळलें?

**वसिष्ठः** अहो, ती भर रस्त्यांत प्रसिद्धपणें श्रीरामांस गालिप्रदान करीत भरतास राज्याभिषेक करण्याविषयीं झटा, असा लोकांस उपदेश करीत जाताना प्रत्यक्ष माझ्या विनतनामक दूतानें पाहिली.

**सुमंतः** तर हा मोठाच अपराध, याबद्दल तिला देहांत प्रायश्चित्त दिलें पाहिजे.

**वसिष्ठः** अहो. "देवो दुर्बलघातकः" ही म्हण अगदीं खरी आहे. तुम्हांला सांगून ठेवतों तिनें जर मनांत आणिलें तर तुम्हांला देखील ती घरीं बसायला लावील.

**सुमंतः** पण हें रामराज्य आहे.

**वसिष्ठः** होईल तेव्हां खरें.

**सुमंतः** गुरुमहाराज, आपण सांगितल्या गोष्टीबद्दल मला विचार केलाच पाहिजे. कारण, हा उपेक्षा करण्यासारखा अपराध नव्हे. राजाधिराज महाराजांच्या इच्छेविरुद्ध लोकांचें मन वळविण्याचा प्रयत्न करणें म्हणजे ही शुद्ध बंडाईच समजावयाची. मी तिला आतां पकडून आणवितों.

**वसिष्ठः** अहो, एव्हांना ती कैकयीच्या मंदिरांत बसून आपला दुष्ट बेत तिला पटवीत असेल. मग तेथें तुम्ही काय करणार?

**सुमंतः** कांहीं झालें तरी माझ्या हातून होइल तितकी सावधगिरी मला ठेवलीच पाहिजे. कारण हा अधिकार माझा आहे. कोण आहे रे तिकडे? त्या विनतनामक दूतास इकडे पाठवून द्या.

**वसिष्ठः** दिवाणजी, मी सांगतो यावर आपला भरवसा नाही काय?

**सुमंतः** तसें नव्हे. गुरुमहाराज, रीतीप्रमाणें चवकशी करावयाची म्हटली म्हणजे त्याचीच मला साक्ष घेतली पाहिजे.

(विनत येउन उभयतांस मुजरा करतो.)

**सुमंतः** कायरे? मंथरा बेफाम होऊन काय बोलत होतीं तें सर्व सांग.

**विनतः** मी जितकें ऐकलें तितकें अक्षरशः सांगतो. ती भर रस्त्यांत मोठयानें ओरडून श्री रामभद्रास उद्देशून असें म्हणत होती -

**धेनुमुखी हा व्याघ्रचि किंवा मधुमुख विषघट समजा॥**
**अनुभव येतां रडाल मग कीं आतां यातें उमजा॥**
**पोशिल भरतचि तुम्हांला॥ जरि तो राज्यपदीं बसला॥1 ॥**

**सुमंतः** (डोळे वटारुन) अरे मूर्खा, तू तेथल्या तेथेंच तिला कैद करून जवळच्या कोतवालींत कां पाठविली नाहींस! तुला तिचें ते भाषण सहन झालें तरी कसें?

**विनतः** महाराज, मी तिचा शिरच्छेद करणार होतो. पण ती पिसाळलेल्या कुत्रीप्रमाणें एकदम पळून गेली.

**सुमंतः** बरें, ती सरकारवाडयाकडे गेली, किंवा दुसरीकडे गेली?

**विनतः** ती कांहीं सरकारवाडयाकडे गेली नाहीं. मोठया बाजारच्या रस्त्यानें गेली.

**सुमंतः** (वसिष्ठाकडे पाहून हांसून) असों, हें एक बरेंच झालें. (कागद घेउन कांहीं लिहून) बरें विनता, हें पत्र घेउन ताबडतोब तूं आमच्या देवडीवर जा आणि मुख्य जमादाराच्या हातीं दे. (विनत मुजरा करुन निघून जातो.)

(पडद्यांत शब्द होतो.)

"कायहो अदभुत चमत्कार हा. वीतिहोत्र ब्राम्हणाच्या पुत्राचें शव जें रणांगणीं ठेविलें होतें, त्यांत प्राणसंचार होऊन गाढ झोपेंतून जागें झाल्याप्रमाणें तो ब्राम्हणपुत्र एकदम उठून बसला".

(हें ऐकून आनंदमुद्रेनें सुमंत व वसिष्ठ एकमेकांकडे पाहतात.)

**सुमंतः** गुरुजी, महाराजांवरील हे मोठें संकट टळलें.

**वसिष्ठः** अहो ज्याच्या पापाचरणामुळें हा ब्राम्हणकुमार अल्पायुषी झाला त्याला शोधून काढून माझ्या रामानें पकडलें असावें, म्हणूनच इकडे हा जिवंत झाला यांत संदेह नाही. मी म्हणतों हें खरें कीं खोटें, हे तुमच्या आतां निदर्शनास येईल.

(इतक्यांत उन्नत प्रवेश करितो व वसिष्ठापाशीं पत्र देतो.)

**वसिष्ठः** (पत्र वाचून आनंदानें,) अहो दिवाणजी, हें पहा श्रीरामभद्राचें आज्ञापत्र वाचा. (पत्र त्याचें हातीं देतो.)

**सुमंतः** (पत्र वाचतो.)

श्रीमत्सदगुरु वसिष्ठमुनि यांचे चरणसेवेशीं रघुकुलोत्पन्न रामचंद्र यांचें अनेक साष्टांग प्रणिपात विशेष., मी गुरुजींची आज्ञा घेउन पापाचरण करणाराचा शोध करीत चाललों असतां, तमसा नदीच्या तीरीं आश्रय करुन शबुंकनामा दासीपुत्र ब्राम्हणकर्म करीत बसलेला आढळला. त्यांस कैद करुन गुरुवर्याकडे पाठविलें आहे. हा धर्मसंबंधी अपराध असल्यामुळें चवकशी करुन योग्य शासन करण्याचा अधिकार आपला आहे. सदरहू दासीपुत्र अज्ञानानें असें आपल्या हातून घडलें म्हणतो व सांप्रत त्यास पश्चात्तापही झाल्याप्रमाणें दिसत आहे.

तरी शिक्षा देतांना थोडीशी त्यावर दया व्हावी अशी विज्ञापना आहे. मी येथें येतांच आपली आज्ञा मला समजली. आपण येइपर्यंत मी उठत नाहीं. चरणीं सादर असो हे विज्ञापना.

**गुरुचरण सेवक, रामचंद्र.**

किती तरी ही लनिता. एकूण स्वारी येउन दाखल झालीच म्हणायची.

**वसिष्ठः** असो. हें काम आटपून मला लवकर तिकडे गेलें पाहिजे. (उन्नतास) काय रे, तो पकडून आणलेला मनुष्य कोठें आहे?

**उन्नतः** महाराज, त्याला देवडीवर बसविलें आहे.

**वसिष्ठः** जा त्याला इकडे घेउन ये.

(उन्नत आंत जातो व ब्राम्हणवेषधारी शबुंकास येऊन येतो.)

**शबुंकः** (वसिष्ठास व सुमंतास नमस्कार करितो.)

**वसिष्ठः** अरे, तुला नमस्कार करण्याचा अधिकार नाहीं. तूं मुजराच केला पाहिजेस.

**शबुंकः** महाराज आज्ञेप्रमाणें करीत जाईन.

(इतक्यांत घाबरलेला विनत येतो.)

**विनतः** महाराज, आपल्या बाजारांतील विनयदत्त शेटजींनीं आपल्या शिपायांकडून मंथरेस कैद करुन इकडे पाठविली आहे.

**सुमंतः** (आनंदाने) वाहवा वाहवा! फार चांगलें झालें. आमच्या शिपायांनी तिला पकडण्यापेक्षां नगरवासी जनांनीं तिला कैद करुन पाठविलें हेंच उत्तम. जा त्या शिपायांसहवर्तमान तिला इकडे घेऊन ये.

(विनत जातो आणि मंथरेसह व तिला कैद करुन आणणा-या शिपायांसह प्रवेश करितो.)

**सुम्मंत :** (त्या शिपायास) कायरे, शेटजींनीं हिला काय म्हणून कैद करुन पाठविलें?

**एक शिपाईः** महाराज आम्हीं आपल्या दुकानांत ध्वजा, तोरणें, रंग इत्यादी लावून सुशोभित करीत असतां ही बाई येऊन श्रीरामचंद्र महाराजांस कानांनी ऐकूं देखील नये असे शब्द बोलून, तोरणें तोडून, ध्वजापताकादि काढून टाकूं लागली . त्या वेळी शेटजींस अत्यंत राग आल्यामुळें, हिला त्यांनीं आम्हांकडून पकडून इकडे पाठवून दिले.

**सुमंतः** (रागानें) ऐका गुरुमहाराज. (मंथरेकडे वळून) काग ए, चांडाळणी, अशी तुला अवदसा कां आठवली?

**मंथरा:** दिवाणजी, तोंड आटपून बोला. ही कैकयी बाईसाहेबांच्या प्रीतींतली मंथरा दासी आहे बरें.

**सुमंत:** (आवेशाने) लाव रे रांडेच्या कानाला चाप म्हणजे ही शुद्धिवर येईल.

**मंथरा:** (रागानें) सोडा मला सोडा, बाईसाहेबांस लुगडें नेसविण्यास मला आतां गेलें पाहिजे. नाहीं तर पहा कसें होईल तें.

**सुमंत:** (अवज्ञेनें) अग, जा, काय होईल तें पाहून घेऊं. (कागदावर कांहीं लिहून) अरे विनता, हें पत्र घेउन या क्रूर गर्भदासीसह आपल्या किल्ल्याच्या अधिका-याकडे जा म्हणजे तो हिला अंधार कोठडींत कोंडून ठेवील व त्याला असें सांग कीं, हिला अन्नपाणी जी घेऊन येईल, तिजपाशीं देखील माझें मोहरबंद पत्र असत जाईल व तशा पत्राखेरीज कोणालाच इला भेटूं देऊं नये.

**विनत:** (पत्र घेऊन मंथरेस) चल ग चल.

**सुमंत :** (शेटजींच्या शिपायांस) कृपा करुन तुम्हीही हिला आणिलें तसें किल्ल्यापर्यंत घेऊन चला. कारण, रस्त्यांत ही दांडगाई करील.

(आज्ञेप्रमाणे मंथरेस घेऊन जातात.)

**वसिष्ठ:** अहो सुमंत, मला आतां अधिक वेळ बसतां येत नाहीं. अरे उन्नता, या दासीपुत्रास तूं देवडीवर घेऊन जा व याच्या पोटापाण्याची चांगली व्यवस्था ठेव. याच्या खटल्याची चवकशी फुरसतीअंतीं होईल.

**उन्नत :** (शंबुकास घेऊन जातो.)

**वसिष्ठ:** दिवाणजी, तुम्हींहीं आतां तयारीस लागाच. आंता -

**साकी.**

**तैलाभ्यंभग स्नान घालुनी पूर्वान्हिक कर्मातें॥**
**करावया मी जातों तिकडे भेटाया रामातें॥**
**सावध तुम्ही रहा॥ टळलें मोठें विघ्न पहा॥1 ॥**

(असें झाल्यावर सर्व जातात.)

## श्रीरामराज्यवियोग

### अंक 2 रा

(तदनंतर दासीपुत्र शंबुक प्रवेश करितो.)

**शंबुकः** (आपल्याशीं) आग लागो या ब्राम्हणांच्या जात्याभिमानाला. त्यांना वाटतें कीं, सर्वांवर वर्चस्व आपलें असावें. असा हा आपमतलबी स्वभाव हरामखोरपणा नव्हे काय? आम्ही सर्व एक ईश्वराचीं लेकरें असून, आम्हांस कळत नव्हतें, अशा त्या ब्राम्हण म्हणविणा-या बंधूंनीं आमचा गळा कापावा, म्हणजे हें कृत्य खाटिकापेक्षां देखील क्रुर नव्हे काय? गुलामांनीं थोतांड कसें रचून ठेविलें आहे पहा. परमेश्वराच्या कृपेनें आरंभीं जे प्राणी निर्माण झाले, ते ईश्वराच्या दयेस सारखे पात्र असतां या ब्राम्हणांनी ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र असे चार वर्ण करुन विराट पुरुषाच्या शरीराच्या कोणत्या भागापासून कोण उत्पन्न झाले याजबद्दल वेदांत लटकेंच एक प्रमाण घालून ठेविलें आहे तें असें -

**पद** - (सुवर्ण केतकी परि जो दिसतो या चा.)

**विराटवदनापासुनि झाले जे नर त्यां ब्राम्हण म्हणती॥**
**ततबाहूपासुनि जे झाले त्यां क्षत्रिय ऐसें वदती॥**
**ऊरुपासुनी जन्म पावले त्यांची वैश्यामधिं गणती॥**
**तच्चरणीं उत्पन्न जाहले ते नर शूद्रचि कीं होतीं॥**
**वेदामाजीं गडबड ऐसी करुनी आम्हां नागविती॥**
**निर्णय कधिं होइल तो होवो पण सांप्रत ही ऐसि गती॥1 ॥**

एवढा घात करुनही त्यांची तृप्ती झाली नाही. आणखी आम्हांस कसें बांधून ठेविलें आहे. परशत्रु आला असता प्राण देण्यास म्हणे क्षत्रियांनीं पुढें व्हावें, उद्योग व्यापार करुन द्रव्य संपादन वैश्यांनी करावे आणि आम्ही शूद्रांनी तर यांची सेवाच करावी आणि या अधमांनीं मात्र नि:काळजीपणानें स्नानसंध्येचे ढोंग माजवून आम्हां तिन्ही वर्गावर वर्चस्व ठेवून खुशाल निरुद्योगी होऊन बसावें. हरहर, काय जुलूम तरी हा! आणखी आपलें कपट

कधींच उघडकीस नये म्हणून, काय खुबी करुन ठेविली आहे पहा, काय तें त्यांचें शस्त्र वेद. ते आपल्याच हातीं ठेवून घेऊन आम्हां तिन्ही वर्गास त्यांत एवढा काय बाऊ आहे हें कळूनच देत नसल्यानें आजपर्यंत त्यांची लबाडी यावी तशी उघडकीस आली नाहीं. पण खचित सांगून ठेवितों कीं, या असंख्य पातकांचें प्रायश्चित्त भोगण्याचा त्यांना कधींनाकधी प्रसंग येणारच, यांत संशय नाहीं. जळो ही कर्मकथा. आपण आपल्याबद्दल काहीं विचार केला पाहिजे. माझी माता तर मी अगदी लहान असतांच मृत्यु पावली. तिचे मला स्मरणही नाहीं. पुढें माझा पिता जो पद्मनाभ ब्राम्हण, त्यानें माझें संगोपन केलें व त्याच्याच संगतीने मला हें ब्राम्हणाचाराचें वेड भरलें व तेणेकरुन माझा उदरनिर्वाहही होऊं लागला. हरहर, माझा पिता जर जिवंत असता, तर मजवर हा प्रसंग कांहीं आला नसता. जे भाविक लोक मला, बालऋषि, बालऋषि असें म्हणून, माझें नित्य दर्शन घेत होते त्यांच्या देखत त्या दुष्ट रामचंद्रानें माझी फार फजिती केली व रथाच्या खांबाला मला बांधून येथे आणलें, येथें आणल्यावर त्या थेरड्या वसिष्ठानें मला दासीपुत्र, असें म्हणून माझ्या काळ्जावर तर डागच दिलें. ब्राम्हणासारखा नमस्कार केला, तर तें देखील त्या वृद्ध कपीला सहन झालें नाहीं. पुढें असें ब्राम्हणकर्म करुं नकोस अशी ताकीद करुन त्यानें सोडून तर मला दिलेंच. मला तर या सर्व कृत्यांचा सूड घेतल्यावांचून चैन पडावयाचें नाहीं. तर काय करावें? माझ्या हातून त्यांचें काय होणार आहे! पण नाहीं, अगदीं निराश होणें चांगलें नव्हे, ‘प्रयत्ना अंती परमेश्वर’ आहेच आहे. (विचार करुन) ओहो खासें स्मरण झालें! (आनंदाने हात चोळून) अरे, माझ्या देखतच गोष्ट झाली असतां मी काय बुचकळ्यांत पडलों आहे पहा! रामराज्याभिषेकास मंथरा विघ्न करील म्हणून त्या धूर्त प्रधानानें तिला कारागृहांत कोंडून ठेविलें आहे. तिची आजच्या आज सुटका होईल, तर काय मौज होईल बरें? ज्यानें मला जन्मांतून उठविलें त्याचा मी उत्तम सूड घेतला असें होईल, पण ही गोष्ट माझ्या हातून व्हावी तरी कशी?

**पद** - (शिणलासि माझ्या बारे या चा.)

**नच माते कोणी स्नेही॥**
**कवणाची ओळख नाहीं॥ नच॥धृ॥**
**आश्रयहीन मी निर्धन ऐसा॥**
**सफलेच्छा कशी होई॥1 ॥**
**मंत्रिजनांच्या सत्तासागरीं॥**

**जणु मी एकचि राही॥**2 ॥

**बलवंतासी वैर कराया॥**

**सजलों मी तर पाही॥**3 ॥

अरे, पण अगदीं निराशाही उपयोगी नाहीं, मंथरेला कारागृहांतून मुक्त करण्याविषयीं प्रयत्न करण्याचा माझा तर सिद्धांत झालाच. मग त्या कामीं माझे प्राण गेले तरी चिंता नाहीं. आतां त्या उद्योगाला लागावे म्हणजे आपोआप एखादी युक्ति सुचेल. बरें, मी स्त्रीचा वेष घेऊन तेथे जाऊन मी मंथरेच्या बहिणीची मुलगी आहे तिला मला भेटावयाचें आहे असें सांगितलें तर तेथील रक्षक मला आंत जाऊं देतील काय (विचार करुन) छे छे, हे साधावयाचें नाही. कारण त्या प्रधानांची सक्त ताकीद मी ऐकिली आहे कीं, आपल्या हातचें मोहरबंद आज्ञापत्र असल्यांवांचून तिजकरितां अन्न घेऊन येणारासही आंत सोड्ं नये. तर मग दुसरी कोणती युक्ती करावी बरें? ( सुचलेसें करुन) अहाहा? हें ठीक आहे, ही मध्यान्हकाळची वेळ असल्यानें, प्रधानजीच्या दासीजनांतून कोणी तरी मंथरेकरितां अन्नपाणी घेऊन जाण्यास या वेळी तयार झालें असेल; तर आपण सत्वर स्त्रीवेष घेऊन, त्या वाड्यांसनिद्ध कोठें तरी उभें रहावे; मग जी दासी तिकडे जाण्यास निघेल तिच्याबरोबर जाऊन जसा प्रसंग येईल तसें वागावें. ठरलें, असेच करावयाचें. ( असें म्हणून निघून जातो.) (तदनंतर वस्त्राच्छादित भोजनाचें ताट व पाण्यानें भरलेला तांब्या घेऊन दासी कौशिकी येते.)

**कौशिकी:** हें एके नवीनच काम आमच्या नशिबीं आलें, त्या मंथरेला कारागृहांत ठेविलें आहे, तिला रोज दुवेळ अन्नपाणी नेऊन पोहोंचवावयाचें. एकेक नवीन कटकट उत्पन्न होते, अशा या उन्हांत इतके लांब जावें तरी कसें? बाई, मी कशीही गेलें असतें, पण बाईसाहेबांची आज्ञा आहे कीं, मुलीला तिकडे पाठवून मी येथेंच त्यांच्याजवळ असावें; पण ती सुरळीतपणानें ऐकावयाची नाही. आतांशा तिची मिजास भारीच वाढली आहे. घटकाभर तिचें पाउल घरीं टिकत नाहीं. म्हटलें म्हणजे म्हातारपणीं माझ्या कामाला तिनें हात लावावयाचा, तें तर एकीकडे राहीलें. पण तिची तब्बेत सांभाळतां सांभाळतां मला पुरें होऊन जातें. पण आतां तिला हुडकूं तरी कोठें ? या वाडयात तिच्या शोधाकरितां फिरुन फिरुन तर बाई माझे पाय अगदीं दमून गेले. (मोठयानें हांक मारिते) अग ए गिरजे, ए मेले गिरे. (पुन: घडयाळाकडे पाहून) अहो शिपाईदादा, आमची ती कारटी कोठें पाहिलीत काय? (ऐकलेसें करुन) काय म्हटलेंत? तुमचें भाषण ऐकत ती येथेंच उभी आहे? तर मग धन्य झाली तुझी हां; अग ए,

मस्तवाल पोरी, चटकर इकडे येतेस कीं हा बोभाटा यजमानाच्या कानापर्यंत गेलाच पाहिजे? मी कांहीं माझे हातपाय रगडायला तुला बोलावीत नाहीं. ज्याचें अन्न खाऊन तूं म्हशीसारखी माजली आहेस त्याचेंच काम आहे.

(नंतर हंसत हंसत गिरीजा प्रवेश करिते.)

**गिरिजा:** (कपाळास आठया घालून) काय म्हणतेस आई?

**कौशिकी:** हं, कांहीं नाहीं म्हणत. हें ताट नी हें पाणी घेऊन आपल्या किल्ल्यांत जा, तेथें मंथरेला कोंडून ठेविली आहे तिला नेऊन दे. हें प्रधानजींच्या हातचें पत्र तेथल्या रक्षकांस दाखविलेंस म्हणजे ते तुला मंथरेकडे जाऊं देतील हां, आटप लवकर. तोंड पहात उभी राहूं नकोस.

**गिरीजा:** आई हे ग काय? मी नाहीं बाई एव्हां जायची. आज वाडयांत काय मौज चालली आहे, ती पहायला मी जाऊं नये वाटतें.

**कौशिकी:** अग आधीं आपलें काम नि नंतर मौज, हां चल लवकर.

**गिरिजा:** आई, आतां तूंच जाईनास परती. मी संध्याकाळचें अन्न घेऊन जाईन पाहिजे तर.

**कौशिकी:** गिरीजे, तूं उगीच तोंड वाजवायला लावूं नको. किती ग जळका उरस्फोड करावा तुजबरोबर, जातेस कीं नाहीं?

**गिरीजा:** आग लागो या दासीपणाला. आई, तूं माझे लग्न ग कां करुन दिलें नाहींस? तेथें मी दोन कामेधामें करुन बसलें असतें. आपल्यासारखी मला दासी ग कां केलीस?

**कौशिकी:** आहाहा उजेड, काय नव-याचा संसार करणार होतीस, तें वरच दिसतें आहे. अग सुग्रास अन्न खायाला, छानदार लुगडीं नेसायला, अंगावर दागिने घालायला, काम ना धाम, सदा चकाट्या पिटीत बसलेली असतेस, तर इतका कंटाळा, मग सासऱ्याच्या लाथाबुक्क्या खाऊन कशी राहिली असतीस कोण जाणे? हां जा आतां लवकर, वेळ नाहीं का होत?

**गिरिजा:** बरें एवढें आधीं सांग, मंथरा म्हटली म्हणजे कैकयी राणीसाहेबांचा केवळ प्राण, तिला एकाएकीं बंदीत कां टाकिलें?

**कौशिकी:** बरें ही चवकशी आपल्याला कशाला पाहिजे? हें राजरहस्य, त्यांत आपण मन घालूं नये.

**गिरिजा:** बरें, दे ते सारें इकडे, ही मी निघालें.

**कौशिकी:** हा कागद मात्र नीट संभाळून ने बरें.

(तिजपाशीं अन्नाचें ताट, तांब्या व कागद देऊन कौशिकी निघून जाते.)

**गिरिजाः** (ते सर्व हाती घेऊन) काय माझ नशीब पहा, आज सितारामाच्या मंगलस्नानाचा समारंभ किती कडाक्यान चालला आहे आणि ती मौज पाहण्यास मी अंतरलेंना! ही एवढी मजवर आलेली कामगिरी करण्याकरितां जर कोणी मिळेल, तर त्याला देण्याला मजजवळ द्रव्य नाहीं, पण माझ्या अंगावरील एखादा दागिना देखील दिला असता.

(इतक्यांत स्त्रीवेषधारी शंबुक येतो.)

**शंबुकः** (स्त्रीच्या ढंगानें हात जोडून) काय बाई तुझें काम करावयाचें आहे? तें मला सांग.

**गिरिजाः** (दचकून) अग बाई, तूं कोण आहेस? माझें एक लहानसें काम आहे, तें जर इमानें इतबारें केलेंस तर मी तुला काहीं देईन.

**शंबुकः** बाई, मी याच रानांत राहणारी माळीण आहे. माझे आईबाप मी लहान असतां मृत्यु पावले. त्यांच्या पश्चात मी काहीं मोलमजुरी करुन पोट भरीत असतें.

**गिरिजाः** (दयेनें) मुली, तूं अगदी निराश्रित आहेस तर एवढें माझें काम केलेस म्हणजे तुझा जन्म आहे तोंपर्यंत तुझा संभाळ होईल अशी मी तजवीज करीन, कारण, मी दिवाणजींच्या घरची दासी आहे.

**शंबुकः** बाई, तुझं काय काम करावयाचें आहे तें मला सांग.

**गिरिजाः** नगराबाहेर सरयू नदीच्या तीरीं किल्ला आहे, तो तूं पाहिला आहेसना?

**शंबुकः** होय. मी तेथें पुष्कळदां गेले देखील आहे.

**गिरिजाः** झालें तर. तेथे मंथरा म्हणून एक स्त्री सरकारच्या हुकुमाने कोंडून ठेविली आहे, तिला हें अन्नपाणी नेऊन दे. हा कागद तेथल्या रक्षकांला नेऊन दाखीव म्हणजे ते मंथरा ज्या कोठडींत आहे, तेथे तुला जाऊं देतील.

**शंबुकः** (हात जोडून) बाई, तुझ्या सांगण्याप्रमाणे हें सर्व मी करिते. (गिरिजेपासून सर्व सामुग्री घेतो.)

**गिरिजाः** मुली तूं तिकडून आलीस म्हणजे मला राजवाडयांत येऊन भेट बरें. मग मी तुझा बंदोबस्त करुन देईन.(आनंदानें आपल्याशीं) अहाहा! हें फार चांगलें झालें, आतां मी वाडयांतच जातें. संध्याकाळपर्यंत आईला भेटलेंच नाही म्हणजे झालें. मग तिला हें कशानें कळणार? (असें म्हणून निघून जातें.)

**शंबुकः** (आनंदानें आपल्याशी) वाहवारे वाहवा! काय मौज झाले तरी ही? काल अनुकूल असला म्हणजे आपलें इच्छित कसे आपोआप सिद्ध होत जाते. काय चमत्कार? मी स्त्रीवेष घेण्याचें मनात आणिलें, पण त्या वेषाचें साहित्य कुठें मजपाशीं होते? मग केलें काय गेलों

सरयूतीरीं, तो एक बाई आपले लुगडें वाळले असे पाहून अंग धुण्यास नदीतं उतरणार तोंच तिचा डोळा चुकवून, तिचें हें वस्त्र हस्तगत करुन घेतलें, म्हणून बरें झालें. हरहर !! सा-या जन्मांत कुकर्म म्हणून माझ्या हातून एवढेंच घडलें, पण करावे काय? प्रसंगाअंतीं मोठमोठयांच्या हातूनहीं असें घडतें. बरें चला, आतां हया किल्ल्याकडे जाऊं, विलंब करुन उपयोग नाहीं. (निघून जातो.)

(तदनंतर कारागृहांत बसलेली मंथरा प्रवेश करिते.)

**मंथराः** (आपल्याशीं) अरेरे काय हा अनर्थ? मी आपल्या हातानें आपणावर ओढून घेतला. मुकाटयानें मी वाडयांत येण्याचें, तें सोडून देऊन त्या बाजारांत जाण्याची मला कशी बुद्धी झाली हें कळत नाहीं. त्या प्रसंगीं तर -

**पद** - (झाली अहो राजेद्रां हरिश्चंद्रा या चा.)

**मन माझें भडकुनि गेलें आली भ्रांति चित्तासी॥**
**म्हणोनिया दैवा झाले ऐसी कारागृहवासी॥धृ॥**
**रामाच्या अभिषेकानें होइल भरत उदासी॥**
**मग कौसल्येची सत्ता न पुसे कोणी कैकयिसी॥**
**गणती मग माझी कोठें आश्रयहीन ही दासी॥**
**जरि सुटलें आजचि येथुनि साधिन कार्यासि॥**1 ॥

व्यर्थ ती आशा. मी शत्रूच्या हातीं सापडून या कारागृहांत पडलें यावरुन सर्वच बेत फसला असेंच समजले पाहिजे.

(तदनंतर अन्नपाणी घेऊन स्त्रीवेषधारी शंबुक प्रवेश करतो.)

**शंबुकः** (आपल्याशीं) किती भयंकर हें कारागृह आहे तरी! जरी मजजवळ प्रधानजींचे आज्ञापत्र होतें, तरी त्या रक्षकांनीं मला दरडावून विचारितांच माझी तर बोबडीच वळली.

असो, येथपर्यंत तर सुरळीतपणें निभावलें, आता पुढें काय होतें पहावे. अहाहा, ही पहा. मंथरा कशी दिसत आहे. ती -

**दिंडी**

**नयन नासा गाल हे लाल झाले॥**

**कंठदेशीं केश ते मुक्त केले॥**
**नारि असुनी उग्रता किती भासे॥**
**पंजरांतिल वाघीण खवळलीसे॥1 ॥**

आतां आपण आलेलें काम करावें, (जवळ जाऊन) बाई तुजकरितां हे अन्न आणि पाणी. ( असें म्हणून ताट, तांब्या तिजपुढें ठेवितो.)

**मंथराः** (चवताळून त्याची मानगुटी धरुन) चल जा येथून निघून. मी माझ्या स्वामिनीचें चरण पाहिल्यावांचून तोंडात पाणी देखील घालणार नाहीं. जा जाऊन त्या दुष्ट मंत्र्याला सांग कीं, जरी रामाला अभिषेक झाला, तरी तुझी खोड तोडण्याइतकें सामर्थ्य माझ्या हातीं राहिल.

**शंबुकः** (आर्जवानें) बाई, मी तुझें साहाय्य करण्याकरितां आलो. मीही पण तुझ्याच पक्षाकडला आहे.

**मंथराः** (आनंदाच्या मुद्रेनें) काय माझें सहाय्य! आणि आलो आहे, तर मग तूं स्त्री नव्हेस.

**शंबुकः** मंथराबाई, आतां विलंब करण्याची वेळ नाहीं. तुमच्यावर जोखीम मोठी आणि अवकाश तर अगदीं थोडा उरला. आजच्या आज सर्व झालें पाहिजे. यास्तव मी जें हें वस्त्र पांघरुन आलों तेंच तुम्ही तोंड न दिसेसें पांघरुन घ्या व हातांत हें ताट व तांब्या घेऊन खुशाल निघून चला. तुम्हांस कोणी प्रतिबंध करणार नाहीं. मी तुमच्या जागीं बसतों. मला ठाऊक आहे, जिच्या हातीं सर्वानुमतें ठरलेलें रामराज्य भरतास देण्याचें आहे, ती काहीं मला फार वेळपर्यंत या कारागृहांत राहूं देणार नाहीं. मी कोण व स्त्रीवेष कां घेतला, इत्यादि वर्तमान मी येथून सुटून आलों म्हणजे सर्व सांगेन. तुम्ही आतां येथून निघा कशा.

**मंथराः** काय माझं सहाय्य? आणि आलों आहें तर मग तूं स्त्री नव्हेस?

**मंथराः** (आनंदाने त्यास आलिंगून) बाबारे, तू माझ्या सुदैव रुपानेंच उत्पन्न झालास. ह्या प्रसंगी तुला काय म्हणावे हें काहीं मला कळत नाहीं. –

**पद** - (काहीं दान मागशील या चा.)

**सुकुमार असुनि तूं फार केवढी छाति केवढी छाती॥**
**निज माते परि तूं दया करिशि मजवरती॥करी॥**
**हा वास सोडवायास कैकयी खास आस अशि होती॥आस॥**
**तूं बाल न मद्रिपुकाल वाटतो चित्तीं॥वाट॥**

**मत्त्राण कराया प्राण आपुले गहाण ठेविले असती॥ठेवि॥**
**तुजसमान न दिसे मला मनुज या जगतीं॥**
**रामासि करुनि वनवासि राज्यपद भरतीं॥राज्य॥**
**ये तदा सचिवपणा तुझ्या देइन हातीं॥1 ॥**

**शंबुकः** अहो मंथराबाई, माझी स्तुति पुरे करा. आपल्या मनांतील कार्यभाग साधण्याकरितां येथून लवकर चला कशा!

**मंथराः** मी येथून वाडयांत पोहोंचण्याचा अवकाश कीं, तुझी येथून सुटका होऊन तू आनंदानें आपल्या कुटुंबांत जाऊन बसशील बरें?

**शंबुकः** छे छे, तेवढें मात्र करु नका कीं सर्वच उघडकीस येईल, मी येथें बरा आहें. मला घर ना दार, मग सुट्न करावयाचे आहे काय? तुम्ही अगोदर आपला मतलब साधून, भरतास राज्याभिषेक करवून नंतर मला सोडविण्याची तजवीज करा. हां निघा आतां येथून.

(शंबुकाने आणलेल्या वस्त्राचा बुरखा येऊन रिकामें ताट व तांब्या हातीं घेऊन)

**मंथराः** बाळा येथून बाहेर कुणीकड्न पडायचें हें मला ठाऊक नाहीं.

**शंबुकः** कोणीकड्न बाहेर पडायचें हें मी तुम्हाला दाखवितो चला.

(असें झाल्यावर दोघेंही जातात.)

(तदनंतर शृंगार चालला आहे व जवळ दासी उभ्या आहेत अशीं आसनस्थ कैकेयी प्रवेश करिते.)

**कैकेयीः** (आरशांतून पाह्न) मालिनी, आज भांग बरोबर आला नाहीं किंचित वांकडा आला.

**मालिनीः** (किंचित हास्यमुख करुन) बाईसाहेब, कमानीवर खेचलेंला बाण समोरुन पाहाणारास, जसा थोड वांकडा दिसतो, तद्वत आजचा भांग आपल्या भ्रुधनुष्यावरील मदनबाणाप्रमाणें वक्र दिसत आहे.

**कैकेयीः** शाबास, बरीच संपादणी केलीस, हां आटपा लवकर. आणखी काय बाकी उरलें आहे.

**मालिनीः** हें काजळ मी डोळ्यांत घालतें, आणि तळपायांला लाक्षारस कुमुद्वती लावील म्हणजे आटपलेंच.

(कुमुद्वती व मालिनी तसें करितात.)

**कैकेयीः** काय गं आज सकाळपासून मंथरा कुठे दिसलीच नाहीं, तिच्यांवाचून मला कसें चुकल्यासारखें वाटत आहे.

**कुमुद्वती:** बाईसाहेब, आज सकाळीं मी पहा-यावर उभी होते व आपण उठलांही नव्हतां, तेव्हा जी मंथरा मोठया लगबगीनें बाहेर पडून गेली ती अद्याप आली नाही.

**कैकेयी:** इतका उशीर ती कधींच बाहेर राहावयाची नाहीं. मग कोणत्या राजकारणांत गुंतली सटवी, तें काहीं समजत नाहीं.

(तदनंतर श्वासोच्छ्वास टाकीत पाय आपटीत मंथरा प्रवेश करिते.)

**मंथरा:** (मालिनीस व कुमुद्वतीस हातानें ढकलून) अग, तुम्ही दोघी येथून निघून चला, मला स्वामिनीला कांहीं गुह्य मजकूर कळवावयाचा आहे.

**दोघी:** तुझ्या सांगण्यानें आम्हांला कसें जाता येईल? धनिणीचा हुकूम झाला कीं, आम्हीं ह्या निघालोंच.

**मंथरा:**(डोळे वटारुन त्यांच्या अंगावर जाऊन) काय, माझें तुम्ही ऐकत नाहीं? लाथ मारुन येथून हाकून देईन सांगतें.

**कैकेयी:** अग, येण्याबरोबर अंगांत आल्यासारखें काय करतेस? आज इतका वेळपर्यंत तूं होतीस तरी कुठें?

**मंथरा:** अगोदर या दोघींना येथून घालवून दे, मग सारें सांगतें.

**कैकेयी:** मालिनी, कुमुद्वती, तुम्ही दोघी दुस-या कामाला चला, मजजवळ मंथरा असूं द्या.

(दोघी निघून जातात.)

कैकेयी: असा काय गुप्त मजकूर आहे तो कळूं दे.

**मंथरा:**अग, तुझ्या सौभाग्यमंदिराला अग्नि लागला असून, मूढे अशी स्तब्ध काय बसलीस?

**कैकेयी:** (घाबरुन) अगबाई, असें अमंगळ काय बोलतेस ती? तुला वेडबीड लागलें कीं काय? अग, माझ्यासारखी भाग्यवान स्त्री, सा-या दुनियेंत सुद्धां मिळायची नाहीं.

**श्लोक कामदा.**

**स्वामिची दया पूर्ण मजवरी॥**
**सर्व राष्ट्र तें आज मम करी॥**
**नाहिं कोणतें न्यून मज असे॥**
**मंथरे तुला लागलें पिसें॥1 ॥**

**मंथरा:** अग खुळे पोरी, तुजवर केवढा दु:खपर्वत कोसळणार आहे, याची तुला कल्पना तरी आहे तरी काय?

**कैकेयी:** मंथरे, असें संदिग्ध बोलून माझ्या जिवाला उगीच काय म्हणून हुरहूर लावीत आहेत? काय असेल तें स्पष्ट सांग.

**मंथरा:** काय कपाळ सांगूं, तुझा सर्वस्वीं घात होतो आहे पहा.

**पद** (लागली बत्ती)

**उद्यां बघ जातें नृपासिंहासन रामातें॥धृ॥**
**होतां अभिषेक कीं रामाला॥**
**येइलग दासपणा भरताला॥**
**पुसतो सांग कवण मग तुजला॥**
**कौसल्येतें॥ सुखसंपत्ती वश होते॥**1 ॥

**कैकेयी:** इतकेंच ना. मीं म्हटलें काय विघ्न आलें आहे, कुणाला ठाऊक. अग, ज्याविषयीं आनंद मानावयाचा त्याविषयीं उलटा तू खेद करितेस, हें पाहून मला भारीच बाई नवल वाटतें. काय सांगूं -

**पद** (रुतला दर्भांकुर चरणी या चा.)

**मम सुत भरत जरी असला॥**
**प्रिय नच रामाहुनि मजला॥**
**मिळतें राज्य जरी त्याला॥**
**अत्यानंदचि मज झाला॥ चाल॥**
**खचित मंथरे वृद्धपणीं भ्रम ये तव बुद्धीला॥**
**म्हणुनि असा हा विकल्प वाटे देहिं तुझ्या शिरला॥**1 ॥

तर मंथरे, उदयीक माझ्या रामाला राज्याभिषेक होणार हें आनंददायक वर्तमान तूं मला सांगितलेंस याकरितां हें घे तुला बक्षीस. (असे म्हणून गळयांतील रत्नहार अंगावर फेकते.)

**मंथरा:** (हात जमिनीवर आपटून दांत चावून) हा मूर्खे, स्वहितविमुखे, तुझे नेत्र गर्वमदाने फुटलें असल्यामुळें पुढें येणारे दु:ख तुला कशाचें दिसणार आहे.

**पद** (कांगे तुझे डोळे फुटले या चा.)

**रामकरीं जरि नृपपद गेलें**
**खचित तुझे तें दैवचि फुटलें॥**
**समजे भिक्षापात्रचि आलें॥**
**भरताच्या हातीं॥1 ॥**
**कौसल्येची मग ती सत्ता॥**
**पडतिल तव शिरि तीच्या लत्ता॥**
**येणा-या श्रीतें निजहातां॥**
**लाथ नको मारुं॥2 ॥**
**होशिल मग कौसल्यादासी॥**
**मिथ्या गर्वे कां तूं फुगसी॥**
**आत्मसुताच्या वदनीं घालिसी॥**
**रक्षा राक्षसिणी॥3 ॥**

कैकेयी, तुझी खरी कळकळ मला असल्यामुळें, माझ्या अंगाची कशी आग होऊन राहिली आहे, तर या गोष्टीचा नीट विचार कर.

कैकेयी: आग लागो तुझ्या त्या जिभेला. अग पापिणी, त्या अजातशत्रु रामाशीं द्वेष करण्याचा मला तूं उपदेश करीत आहेस काय? अग त्याचे गुण तरी ऐकून घे एकदां तुझ्या पापी कानांनी -

**पद** (नांदे कैलासीच्या शिखरी या चा.)

**जो मम नयनचकोरा इंदू॥**
**नाहीं ज्याला मत्सरबिंदू॥**
**दुर्भाग्ये तूं नच त्या निंदू॥ माझ्या रामा॥1 ॥**
**कौसल्येहूनि ममता करी॥**
**करुणासागर तो मजवरी॥**

**तरेल पातकि जरि उच्चारी॥ त्याच्या नामा॥**2 ॥
**प्राणप्रिय ज्या सर्वहि बंधू॥**
**गुणरत्नांचा निर्मळसिंधू॥**
**आपपरतेचा नाहीं गंधू॥मुनिविश्रामा॥**3 ॥
**रामाभरता भेदचि नाहीं॥**
**दोन्ही मूर्ती एकचि पाहीं॥**
**ही मी आण नृपाची वाही॥ न टळे नेमा॥**4 ॥

**मंथरा:** (दांत चावून) दुष्टे कपाळकरंटे, कशाला राजकन्या झालीस? चांडाळणी, त्यापेक्षां एखाद्या भिका-याच्या पोटीं आली असतीस तर बरें झालें असतें. मला ठाऊक आहे, आपणावर राजाची पूर्ण प्रीति आहे, तेव्हां तो काहीं आपले अकल्याण होऊं देणार नाहीं. या घमेंडींत तूं आहेस, पण तोच राजा तुझ्याशीं किती कपटाने वागतो, तें तुला कुठे समजलें आहे -

**पद** (कांगे तुझे डोळे फुट्‌ले या चा.)

**खोटी तुजवरती नृपममता॥ सर्व लोभ कौसल्येवरता॥ ठेवी**
**चिंतामणि तिजकरितां खापर तुजसाठीं॥**1 ॥ **वाटे तुज तो**
**नृप निष्कपटी॥ पण केवळगे विषयासाठीं॥ वागे ऐसा त्याच्या**
**पोटीं॥ प्रीति खरी नाहीं॥**2 ॥

हें पाहिजे तर मी तुला सिद्ध करुन दाखवितें -

**पद**

**मातुलागृहिं भरता पाठविलें॥**
**मजला कारागृहिं कोंडिलें॥**
**त्वन्नेत्रां उघडाया सुटलें॥ दैवें तेथोनी॥**3 ॥

**कैकेयी:** असें काय? थांब, कारागृहातून सुटलीस तर सुळावर चढशील. पहा, उदयीक जो राजा होणार त्याची निंदा त्याच्या मातेपाशीं करणारणीस सुळावर देण्याची शिक्षा अगदीं हलकी आहे. कोण आहेरे तिकडे? या सटवीच्या मुसक्या बांधून हिला दिवाणजीकडे घेऊन चला.

**मंथराः** (छातीवर हात मारुन) झाला, सर्वस्वीं घात झाला. माझ्या आशेचा किंचित तंतु होता तोही तुटून गेला. (दांत चावून) अगं ए फुटक्या नशिबाचे पोरी, मला सुळावर दे, नाहीं तर हत्तीच्या पायाला बांध. मी कां माझ्या सुखाकरितां रडतें; पण जी राजकन्या, राजभार्या आणि राजपुत्र प्रसवणारी, तिला दुस-याचीं पतकरलीं, पण प्रत्यक्ष आपल्या सवतीचीं लुगडीं धुवून पोट भरण्याचा प्रसंग येणार म्हणून माझ्या काळजाचे तिळातिळाएवढे तुकडे होताहेत! कसें करुं! (असें म्हणून जमिनीवर गडबडा लोळते.)

**कैकेयीः** (आपल्याशीं) काय बाई अतित्यायीपणा हा? ही माझी लहानपणाची दायी, इचें मी दूध प्यालें आहे म्हणूनच इचें सर्व मला सहन केलें पाहिजे. (उघड) मंथरे, तुला सांगून ठेवतें, तू जरी आणखी किती सोंगें केलीस तरी रामाविषयीं माझे कांहीं मन बदलायचें नाहीं.

**मंथराः** (पडल्या पडल्याच) बरें, असें काय? तर मग हा पहा माझा निश्चय. ही हातांतली हिरकणी खाऊन तुजदेखत मी हा प्राण सोडितें. (असें म्हणून हातांतील आंगठी चावलीसें करितें.)

**कैकेयीः** (घाबरेपणानें आसनावरुन उठून तिला कवळून) मंथरे, असें काय वेडयासारखें करावें बरें? (मंथरेच्या शरीरास स्पर्श होतांच तिच्या शरीरांतून कैकेयीच्या देहांत कलि प्रवेश करितो त्याबरोबर डोळे वटारुन अंगांत आल्यासारखें करुन कैकेयी तेथेंच बसते.)

**मंथराः** चढली कमान की या कलिची ॥ शिवाले बरे झालें ॥1॥

**मंथराः** (कैकेयीच्या मुखाकडे पाहून आनंदानें आपल्याशीं)

**पद** - (मोठा झंझा वायू सुटला या चा.)

**सफलेच्छा ती करिन सुरांची॥**
**आली मत्करिं तनु कैकयिची॥**
**चढली कमान कीं या कलिची॥**
**शिवलि बरें झालें॥ आतां॥**1 ॥
**नृपमानसदुर्गाभंगाया वज्रचि करिं आलें॥ आतां॥धृ॥**
**पेटवितों मत्सराग्नि सारा॥**
**ओतुनि विकल्प सुतैलधारा॥**
**सहजचि भूपति चित्तागारा॥**
**समजा भडकविलें॥ आतां॥**2 ॥

**आतां रामा कैसा होतो॥**
**अभिषेक उद्यां हें मी बघतों॥**
**कलिसत्ता कैसी दाखवितों॥3 ॥**
**धैर्य मला चढलें॥ आतां॥4 ॥**

(उघड) कैकेयी तुझा कसा बेत ठरला तें मला कळूं दे.

**कैकेयी:** मंथरे, तूं म्हणतेस तें खरेंग खरें. सखे, या संकटांतून मी कशी पार पडेन याबद्दल तूंच एखादी युक्ति काढ. पहा, तू सांगशील तसें मी ऐकतें.

**मंथरा:** (आनंदानें तिला कुरवाळून) हा खुळे पोरी, आतां शुद्धीवर आलीस ना? असो, आतां राजाची गांठ पडल्यावर तूं कसें वागायचें व त्याला पाशांत घालून आपला हेतु कसा सिद्ध करावयाचा हें तुला मी सर्व सांगतें.

**कैकेयी:** मंथरे, आपला मतलब साधण्याचा फारच बाई विघ्ने आहेत. आधींच ज्येष्ठ भार्येचा व त्यांतून सर्वात वडील, सर्वांचा आवडता अशा रामाला सोडून माझ्या भरताला राज्य मिळण्याला आधार तरी काय आहे?

**मंथरा:** मजपाशीं शेकडो आधार भरले आहेत. चल तुला सर्व सांगते.

**कैकेयी:** मग उशीर कशाला? कसें करुं तें सांग.

**मंथरा:** छे, छे येथें गोष्ट मी बोलणार नाहीं. ती पहा चहूंकडे माणसें हिंडताहेत. कदाचित त्यांच्या कानावर ही गोष्ट जाईल. मसलत अगदीं एकांतींच झाली पाहिजे, यास्तव तुझ्या खासबागेंत चल, म्हणजे तुला सर्व सांगतें.

**कैकेयी:** बरें तर दोघी मिळून गेलो असतां उगीच संशय येईल, म्हणून मी पुढें होतें. तूं किंचित अवकाशानें मागून ये.

(कैकेयी निघून जाते.)

**मंथरा:** (आनंदानें आपल्याशीं) एकूण हें कपटनाटक इतक्या रंगाला आलेंना! आतां मघांचे ते शब्द अगदीं, खात्रीनें म्हणण्यास मला कुणाच्याही बापाचें भय नाही -

**पद**

**रामासि अनुकूल असती त्यांचे पाडिन दांत तरीच खरी मी॥**
**मंत्रीजन कुलगुरु यांचा तो मोडिन बेत तरिच खरि मी॥**

**कैकयी वळवूनि तिजकरिं भूपा व्यसनीं घालिन तरिच खरी मी॥**
**रामा वन भरता सिंहासन देइन जाण तरीच खरी मी॥1 ॥**

(सर्व जातात.) अंक 2 समाप्त.

## श्रीरामराज्यवियोग

### अंक तिसरा

(तदनंतर सिहासनाच्या उजवीकडील आसनावर वसिष्ठ बसले आहेत, व डाव्या अंगास सुमंत उभा आहे व इतर मानकरी योग्य स्थळीं बसले आहेत असा देखावा.)

राजा:

**साकी.**

**सत्वधीर नृप दिलीप रघ्वज ज्या सिंहासनीं बसले॥**
**शेवटिं ते मत्करीं येउनि मीं बहुदिन उपभोगिलें॥**
**देउनि रामकरीं॥ सेविन मग ती शांति खरी॥1 ॥**

**वसिष्ठः** राजा, तुझ्या वंशांतील कुलव्रत तीन पिढया चाललेलें जे मी पहात आहे, तदनुसार तुझा हा विचार अगदीं योग्य आहे. पहा -

**पद** - ( नानापरीचे विडे मनोहर या चा.)

**सुदक्षिणापति दिलीप नंदिनीसेवा करुनी रघुकुमरा॥**
**संपादुनि निज वृद्धपणीं दे मग तत्करिं ही वसुंधरा॥**
**राज्य करी रघुराय बहुत दिन जेव्हां उपरम त्या आला॥**
**अज पुत्रातें नृपपदीं बसवुनी आपण वनवासी झाला॥**

**अजरायें तैसेंच अमित दिन राज्य करुनि जन सुखवोनी॥**
**तुजला सिंहासनिं बसवोनी गेला आपण तपोवनीं॥**
**तोंचि कुलव्रत पाळिशी तूं बा अभिषेकुनि सुत रघुवीरा॥**
**शांति सुख दया या इच्छिशि कीं ठेवुनि तच्छिरीं राज्यभरा ॥2 ॥**

**राजाः** गुरुजी, पुत्र कर्ते झाले असतां त्यांस एकीकडे ठेवून लोभानें आपणच राज्यासक्त होणे, हें मोठें लाजिरवाणें आहे. कारण त्यापासून अनर्थ मोठे होतात, त्या तशा राजकुमारांना मग –

**दिंडी**

**निरुद्योगें आलस्य शिरे वेगें॥**
**दुष्टसंगें दुर्व्यसन त्यांसि लागे॥**
**तरुणपणिं ते संपत्तिमदबलानें॥**
**नीच कामीं रत होति कीं सुखाने॥1 ॥**

याकरितां त्यांचें मन अन्य विषयाकडे फारसें गुंतलें नाहीं, तोंच त्यांना त्या राज्यरुप गाडयाच्या धुरीस जुंपून टाकलें म्हणजे त्यांस कमजास्ती चेष्टा करण्यास फुरसतच रहात नाहीं. शिवाय, या राजलक्ष्मीला वरवधूप्रमाणें जसा तरुण राजा प्रिय होतो, तसा वृद्ध आवडत नाही. (सर्व तोंडाला पदर देऊन मर्यादेनें हसतात.)

**वसिष्ठः** राजा, तुजसारखे सद्विचारी राजे फारच थोडे असतील.

**राजाः** तुम्हां सर्वांच्या विचारें माझ्या रामाला राज्याभिषेक करण्याचें मी ठरविलें आहे. तर पुन: आणखी एकवार विचारतों. एवढा मोठा हा राज्यभार आपणावर घेण्यास तो समर्थ आहेना? कारण वयानें अद्यापि तो लहान आहे.

**वसिष्ठः** राजा, त्याविषयी शंका अगदीं नको. त्याला लहान कोण म्हणेल! वैधसदीक्षा समाप्त होण्याच्या पूर्वीच त्यानें केवढी अचाट कृत्यें केली, ती लक्षांत नाहीत काय? –

**पद.**

**निजमख रक्षाया कौशिक नेई, सौमित्र रघुराया॥**
**एक एक शरें पथिं वधुनि टाकीयली रामें**
**राक्षसि विक्राळवदनकाया॥नि॥धृ॥**

**रघुकुल मुकुटमणी॥ शूराग्रणी॥**
**वसतां क्रतुरक्षणीं॥ बहुरक्षोगणवक्ष विदारुनि॥**
**उद्धरिली गौतममुनिवरजाया॥नि॥1 ॥**
**राजीवनयन करी॥ चकित सारी॥ जाउनि जनकपुरीं॥**
**शिवधनु भंगुनि जानकि वरिली परशुधरा**
**लावी शिर नमवाया॥नि॥2 ॥**

**राजाः** खरोखर गुरुमहाराज, माझ्या रामाच्या लहानपणीच्या चरित्राचें स्मरण झालें म्हणजे अशी काहीं स्थिती होते कीं काय सांगूं -

**पद** - (वदनी धर्मजलाला या चा.)

**आनंदाश्रुजलानें॥ होती पूर्णहि नयनें॥**
**भरते तनु पुलकानें सुख वदवेना वदनानें॥1 ॥**

**वसिष्ठः** राजा, श्रीरामचंद्राची गणना मनुष्यकोटींत करणारे करोत, मी तर त्याला निराळयाच स्वरुपानें पाहतों.

**राजाः** (आनंदानें) झालें तर, उदयिक रामाला राज्याभिषेक करण्याचा निश्चय अगदीं ठरला. (सुमंताकडे वळून) कां दिवाणजी, तुम्हांकडील सर्व तयारी आहेना?

**सुमंतः** (हात जोडून) तयारीला काय कमी आहे, गुरुमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे सर्व सिद्धता करुन ठेवली आहे.

**राजाः** तुम्हांला आणखी एक गोष्ट विचारायाची आहे ती ही कीं, पुढें माझ्या रामाला त्रास पडेल, अशीं माझ्या कारकीर्दितील कामें शिल्लक राहिलीं नाहींतना?

**सुमंतः** छे, छे, अशी गोष्ट होईल तरी कशी? कामें शिल्लक ठेवून राजाधिराजांनीं दरबार खलास कधींच केलें नाहीं.

**राजाः** तर आतां सर्वत्रांनीं माझी विनंती ऐकावी. माझ्या परम पूज्य तीर्थरुपांनीं, हें राज्यपद माझ्या करीं दिल्यापासून यथाशक्ति जे मीं प्रजेचें हित केलें असेल, त्याला साक्ष हे गुरुचरण आहेतच. तथापि अज्ञानानें किंवा अधिकारमदानें माझ्या हातून एखादें अकार्य होऊन कोणाचीही हानि झाली असेल, तर त्याबद्दल त्यांनीं क्षमा करावी व पुढें माझ्या रामावर मजप्रमाणेंच प्रेम ठेवून त्याचें कोणतेंही न्यून पडूं न देतां त्यास निभावून घ्यावें, अशी

तुम्हां सर्वत्रांस प्रार्थना करुन मी आतां या सिहासनावरुन उतरतों. (असे म्हणून खाली उतरतो, सुमंत हात देतो. तोंच पडद्यांत वैतालिक शब्द करितो.)

**पहिला वैतालिकः**

**॥गद्य॥**

**गर्वबलोन्मत्तरिपुवर्ग मर्दुनि,**
**सकल सामंत चक्रवर्ति भूपालशिर पदिं नमविलें॥**
**प्रखर रात्रिंचरस्तोम सर्व संहरुनि**
**मनुजदुष्प्राप्य अमर सिंहासनार्ध साधियलें॥**
**जितसुरसुंदरीसौंदर्य सौभाग्यरमणी,**
**कैकयिसह नंदनवनविहरण तूंचि केलें॥**
**सकल भोगोपभोगा सारुनि,**
**सांप्रत बहुत शोभतो सिंहासनापासुनि विराम तूझा॥**

**दुसरा वैतालिकः**

जयजयकार महाराज -

**॥गद्य॥**

**याचकजनयाचित पूर्ण करुनि कल्पतरुसहि लाजविलें ॥**
**परसुखोत्पादनिं ब्रम्हदेवास, साधुपालनिं विष्णुस,**
**शत्रुसंहरणिं कालरुद्रासहि दिपविलें ॥**
**विमलराज्यनीतिस अनुसरुनि पुत्रापरि**
**निजप्रजापालन अमित दिन तूंचि केलें ॥**
**आत्मसदृश आत्मारामिं, सकलाभिरामिं,**
**राज्य अर्पुनि, सांप्रत बहुत शोभतो,**
**सिंहासनापासुनि विराम तूझा॥1॥**

**राजाः** (सिंहासनास प्रदक्षिणा व नमस्कार घालून हात जोडून) गुरुमहाराज, आता मी निरोप घेतों.

**वसिष्ठः** राजा, तुझा जयजयकार असो.

(सुमंत राजास हातीं धरुन, मर्यादेनें आंत पोहोंचवून पुन्हां प्रवेश करितो.)

**वसिष्ठ :** (गहिवरुन) अहो दिवाणजी, हा दशरथाचा सिंहासनोत्सर्ग माझ्या विरक्त नेत्रांसहि अश्रु उत्पन्न करिता झाला.

**सुमंतः** खरोखर गुरुमहाराज, जरी श्रीरामचंद्राला अभिषेक होणार म्हणून उत्सुकता वाटते, तरी दशरथमहाराजांचा हा राज्यवियोग भारी असुख उत्पन्न करितो.

**वसिष्ठः** बरें, स्वारी आतां कोणीकडे गेली?

**सुमंतः** विश्रांतीकरितां कैकेयी बाईसाहेबांच्या मंदिराकडे गेली. गुरुमहाराज, मी मंथेरेचें प्रकरण सरकारास कळविलें, हे चांगले केलें कीं नाहीं?

**वसिष्ठः** फार चांगलें केलेंत, हा राज्याभिषेक होइपर्यंत त्या सटवीला तेथेंच असू द्या. नंतर पाहून घेतां येईल.

**सुमंतः** गुरुवर्य, पौर्णिमेच्या चंद्राचा अस्त झाला असतां सूर्योदय होइपर्यंत जो संध्याकाळ असतो तद्वत दशरथ आणि रामचंद्र महाराजांच्या कारकीर्दीचा हा संध्याकाळच समजला पाहिजे.

**वसिष्ठः** पण हा संध्याकाळ मला भारीच बिकट वाटतो. कारण तुम्हांला माहीत आहेच आहे.

**सुमंतः** महाराज, त्याविषयी भीति कशाला पाहिजे. आपण त्या सर्वांचें बीजच दडपून टाकलें आहे.

**वसिष्ठः** बरें, चला आतां उदयिक सर्वत्रांनीं आपआपले स्नानसंध्यादि विधि आटपून सूर्योदयाबरोबर वाडयांत यावें. कारण -

**साकी.**

**स्नानें मंगल तिलक करोनी भूषणमंडित यावें॥**
**नयनमनोहर रामवदन तें नृप सिंहासनिं पहावें॥**
**दर्शन तें ऐसें॥ घडतां मुक्त व्हाल तैसें॥1 ॥**

सर्व: ठीक आहे. (सर्व निघून जातात.)

(तदनंतर आनंदभरित मुद्रेने मंथरा प्रवेश करिते.)

**मंथराः** (खदाखदां हसून) माझी सर्व काळजी दूर झाली. कैकयीला मी अशीं तयार करुन ठेवली आहे कीं, महाराजांच्या आर्जवयुक्त भाषणाला न जुमानितां ती आपला मतलब

साधीलच साधील. अहाहा! माझा विजयध्वज शत्रूच्या अभेद्य दुर्गावर तर चढला, आतां थोडक्याच काळांनें तो असा फडफडूं लागेल कीं, सर्व लोक माझ्या अकलेची तारीफ करुन तोंडात बोटें घालून; थक्क होऊन जातील.

**पद** - (टाकिला याने या चा.)

**जिंकिला हा मी । हा मी डाव अपुला,**
**पाडिला फर्शीं त्या राजाला ॥धृ॥**
**राजा जरि झाला । झाला वश स्त्रीला,**
**देइल राज्यचि भरताला॥1 ॥**
**यशाचा झेंडा । झेंडा फडफडला,**
**शत्रुच्या अभेद्या किल्ल्याला॥2 ॥**
**दुंदुभी झडती । झडतिल स्वर्गाला,**
**जातां राम दंडिकेला॥3 ॥** (चिं.ग.कोल्हटकरकृत)

माझ्या बिनतोड करामतीनें मोठे राजकुशल आणि दूरदर्शी अशा कित्येक लोकांच्या अकलेची मातीच करुन टाकली. तो मंत्री सुमंत्या माझ्या कानाला चाप लावणारा होता, आणि तो थेरडा राजगुरु सरडयासारखी आपली मान हालवून आपलें अनुमोदन देत होता. पण म्हणावें, त्या चापांत माझे कान सांपडतात, की गुलामांनों तुमच्या माना अटकतात हें पहातें. खरोखर अशा दुर्घट प्रसंगीं यश:प्राप्ती मजप्रमाणें आजपर्यंत कोणालाच झाली नाहीं.

**पद** - (गंगानधी ती या चा.)

**केला होता घातचि मजला कारागृही कोंडोनी॥**
**सुदैव माझें उभें राहिलें सुटलें कीं तेथोनी॥**
**विफल सर्व होतें जरी जाता स्वल्प काळ तो टळुनी॥**
**द्यूतांतिल जणूं इच्छित फासा पडला कीं अवसानीं॥**
**धूर्त शिरोमणि सुमंत मंत्री अजवरि फसला नसुनी॥**
**केला अंधचि त्याचीं बोटे तन्नेत्रीं घालोनी॥**
**प्रीती रामावरी कैकयीची होती भरताहूनी॥**
**महतप्रयासें तिजला आणिलें त्या मार्गा वळवोनी॥**

खचित सांगतें ही सर्व यश:प्राप्ति त्या स्त्रीवेषधारी मुलानेंच करुन दिली. नाहीपेक्षा माझ्या मनांतील मांडे मनातच रहात होते. बरें, मजवर इतकें निष्कारण प्रेम करणारा, तो कोण असावा बरें? (विचार करुन) माझा तर कांहीं एक तर्क चालत नाहीं. असो, ज्यानें आपलें जिवावरचें साहस करुन मला बंधमुक्त केलें त्याची त्या कारागृहांतून सुटका केली पाहिजे. कैकयीचा हुकूम दिवाणजीला पाठवून तिकडून तजबीज करावी. तर उगीच बोभाटा होईल, याकरितां ज्या मार्गानें त्या मुलानें मला सोडविलें त्याच उपायानें आपणही त्याला सोडविलें म्हणजे अगदीं बेमालूम होऊन जाईल. (वर पाहून) अहाहा! कारागृहांतील मनुष्यांना संध्याकाळचे अन्न पोहोंचविण्याचीही वेळ आहे, तर आपण आता दिवाणजीच्या वाडयाकडे जाऊन आणि मला कोणी न ओळखतील असें रुप पालटून कारागृहांत जाण्याची कामगिरी आपणावर घेऊन तेथें जाऊन आपण तेथें बसून, त्या बिचाऱ्याची सुटका करावी म्हणजे झालें. (पडद्याकडे पाहून) ह्या पहा, त्या द्वाड दासी, मालिनी व कुमुद्वती इकडेच येत आहेत, तर त्यांच्या नजरेस पडून उपयोगी नाहीं.

(असें म्हणून जाते.)

(तदनंतर कैकयीच्या दासी मालिनी व कुमुद्वती प्रवेश करितात.)

**कुमुद्वती:** बाई मालिनी; आता कसें ग करावें? बाईसाहेब कांहीं सांगितलेलें ऐकत नाहींत व अंगाला हात देखील लावूं देत नाहीत. केलेला सर्व शृंगार विसकटून केंस मोकळे करुन जमिनीवर पडल्या आहेत, महाराजांनीं जर का हें पाहिलें, तर खचित आमचीं डोकीं उडवतील. आतां करावें तरी काय?

**मालिनी:** अग, आम्हांकडे काय आहे? मी तर त्यांना तीनदां पलंगावर बळेंच उचलून निजविलें, पण धाडदिशीं जमिनीवरच पुन: आंग टाकतात.

**कुमुद्वती:** मला वाटतें आपणच अगोदर हें महाराजांना जाऊन कळवावें, म्हणजे आमच्यावर हा दोष रहाणार नाहीं.

**मालिनी:** या वेळीं महाराज दरबारांत बसले आहेत. तेव्हां हें वर्तमान कळविण्याजोगी संधी आम्हांला कशी मिळेल?

**कुमुद्वती:** खरोखर मी मोठया कचाटयांत सापडल्यासारखी झालें आहें. त्यांच्याजवळ असावें म्हटलें तर आसपास फिरकूं देखील देत नाहीत . त्यांच्या शिव्यांला न जुमानता तसेच उभें

राहिलें, तर लाथाबुक्क्या देऊन बाहेर घालवितात, असें तीन वेळां झालें तेव्हां करावें तरी काय?

**मालिनीः** सखे, बाईसाहेबांची अशी कडक तब्बेत कधींच पाहिली नाहीं, नी आजच असें करायाला झालें तरी काय असेल?

**कुमुद्वतीः** काय झालें आहे ईश्वराला ठाऊक. त्या मंथरेची गांठ पडल्यापासून अशा खवळल्या आहेत. मग काय मेलीनें उपदेश केला आहे कोण जाणे.

**मालिनीः** सखे, आजचा प्रसंग खरोखर बिकट आहे. (पडद्याकडे पाहून) अगबाई, ती पहा महाराजांची स्वारी बाईसाहेबांच्या मंदिरात गेली व हातांत करदीप घेऊन पोहोचविण्यास आलेल्या दासीही परत निघून गेल्या तर लवकर चल. कारण प्रसंगीं महाराज आम्हालाही हांक मारतील.

**कुमुद्वतीः** हं चल लवकर. (दोघी बाजूला होतात.)

(तदनंतर केश अस्ताव्यस्त करुन पलंग सोडून जमिनीवर कैकयी लोळत आहे व जवळ राजा बसला आहे असा प्रवेश होतो.)

**राजाः** (तिला कुरवाळून) सुंदरी, तुला कोप येण्याचे कारण मघांपासून मी किती प्रकाराने विचारीत असतां, मजशीं एक अक्षरसुद्धां बोलूं नयेस असा मीं अपराध तरी कोणता केला आहे? (मुखाकडे पाहून) प्रिये, मजविषयीं हीं इतकी कठोरता! ठीकच आहे. इंदीवाराप्रमाणें नेत्र, कमलाप्रमाणें मुख, कुंद्द पु्ष्पासारखे दंत, पल्लवाप्रमाणें अधर आणि चंपकदलाप्रमाणें सर्व शरीर, इत्यादि सर्व कोमल असतां तेवढें तें ह्यदयच मात्र दगडाप्रमाणे कठोर कसें झालें हें काहीं कळत नाहीं. (तिला उठवून बसवून) सखे, असें मौन धरुन बसलीस तर मीं काय समजावें बरे? खचित तुझ्या चर्येवरुन तुझ्या मनाला अत्यंत पीडा झाल्यासारखें दिसत आहे, तर हे हंरिणाकक्षि -

**पद** - (अभिनव मधुलोलुप या चा.)

**कवणें तुच गांजियलें सांग सुंदरी॥**
**त्यजुनि शेज लोळसि कां ऐसि भूवरीं॥ कवणें॥**
**प्रिय नाहीं तुजविण मज अन्य कामिनी॥**
**इच्छिशि तरी दास्य करिल इंद्र कामिनी॥**
**चाल॥ रंकातें राव करिन्॥ रावातें करीन दीन॥**

**वध्यातें प्राणदान॥ निर्वध्या खचित वधिन॥**
**चाल॥ रामाची शपथ सर्व सत्य मी करी॥ कवणें॥1 ॥**

(उत्तराची वाट पाहून) इतका मी कंठशोष करीत असतां जेव्हां तूं बोलत नाहींस तेव्हां माझाच तुला कंटाळा आला आहे यांत संशय नाहीं. ( रागाने जमिनीवर हात आपटून) काय? इची प्रकृती इतकी बेताल झाली असतां इच्या दासीजनांतून कोणीही जवळ नाही?

(मालिनी व कुमुद्वती हात जोडून घाब-या घाब-या येतात.)

**कैकयी:** (चवताळून) खबरदार रांडांनो फाजिलपणा कराल तर. मी बोलावल्यावांचून इकडे येऊं नका म्हणून तुम्हांला सांगितलें असतां, कोणाच्या हुकुमानें तुम्ही आलांत. लुब-या मेल्या. आल्या तोंडपूजा करायला, निघून चला येथून.

**राजा:** (त्यांना जाण्याविषयीं हातानें खूण करुन आपल्याशीं) मला वाटलें होतें की, हिची बोलण्याची शक्तीच नाहींशी झाली! पण नाहीं. (उघड तिला आलिंगून) प्राणदयिते, दासीजनाप्रमाणें मलाहीं चार शिव्या दे. पण सखे एकदां मजशीं भाषण करग.

**कैकयी:** (राजास एकीकडे लोटून) पुरे पुरे, मजवर तुझी कितीशी ममता आहे ती समजली. निर्दया, षंढा, मी विश्वासानें तुझ्या अंकावर शिर ठेवून निजलें असतां, कठोरा, माझाच गळा कापायला तुझा हात धजला तरी कसा?

**राजा:** (चकित होऊन) काय, मी तुझा गळा कापला! तर खचित सांगतों, तुझ्या बुद्धीला भ्रम झाला, यांत संशय नाहीं.

**कैकयी:** काहीं नाहीं, म्हातारपणीं आपल्याच बुद्धीला भ्रम होण्याचा संभव आहे.

**राजा:** पण कैकयी, तूं येथें शोभत नाहींस. तुजसारख्या श्रृंगारलक्ष्मीच्या पट्टराणीनें मजसारख्या अपराध्यास शिक्षा करण्याकरितां आपल्या सिंहासनावर बसलें पाहिजे. तर ऊठ मंचकावर बसून काय बोलायचें तें बोल. (तिला बलात्कारानें मंचकावर बसवून आपण शेजारीं बसतो.)

**राजा:** प्रिये, साऱ्या जन्मांत दृष्टीस पडला नाहीं, असा कोप तुला कशाचा आला आहे बरें?

**कैकयी:** महाराज, ही पांचट भाषणें आज मला आवडत नाहींत, आजपर्यंत आपली जी पत होती ती नाहींशी झाली, याकरितां माझी जी ठेव आपणाशीं आहे ती आतांच्या आतां दिली पाहिजे.

**राजाः** प्राणदयिते, तुझी कोणती ठेव असेल ती असो; पण माझ्या पंचप्राणांची ठेव जी तुजजवळ आहे, ती नीट सांभाळ म्हणजे झालें.

**कैकयीः** काय? माझ्या ठेवीचें आपल्याला स्मरण नाहीं? ठीकच आहे. कांहीं वेळाने माझ्याबरोबर लग्न केल्याचें देखील आपणाला स्मरण रहाणार नाहीं बरें.

**राजाः** सखे, अशी रागावूं नकोस, अशी कोणती ठेव आहे ती उघड करुन सांग.

**कैकयीः** बरें तसेंच कां होईना, ऐका -

**पद** - ( अर्धतनु वारुळी बुडाली या चा.)

**वृषपर्व्याशीं युद्ध चाललें स्वर्गलोकिं जेधवां॥**
**सन्निध होतें मी तेधवां॥**
**शुक्रशक्तिनें रथाक्ष जेव्हां मोडुनि गेला नवा॥**
**तदा मीं न गणुनि आपुल्या जिवा॥**
**चक्रीं कर घालुनि सावरिला रथ आपुला राघवा॥**
**झालां पात्र यशा अभिनवा॥**

**राजाः** ज्या शूर कृत्यांबद्दल सर्व देवांसहवर्तमान सुरनाथानेंही तारीफ केली, तें कसें विसरेन बरें? पुढे.

**कैकयीः** (मागील पदांतील अंतर्चाल)

**ते समयीं दोन वर मज आपण अर्पिले॥**
**ते तुम्हां जवळि अद्यापि बाकि राहिले॥**
**तत्स्मरणचि मजला आजवरि नच जाहलें॥**
**चाल॥ पूर्ण करावे ते माझे वर या क्षणिं नृपपुंगवा॥**
**ना तरि न्या पितरां रौरवा॥**

**राजाः** एवढेंचना? मला वाटलें होंतें काय बाऊ आहे कुणाला ठाऊक. अगं ठेव परत घेण्याला इतका का आक्रोश करावा लागतो? तूं संतोषानें मागून घेतले असतेस तर मी दिले नसते कां! अग, तुला ते केव्हांव्ही द्यावयाचेच आहेत.

**कैकयीः** मग मागूं तर?

**राजाः** अशी गडबड कां करितेस? वर मागावयाचे ते नीट विचारानेंच मागितले पाहिजेत. नाहींपेक्षां तेच शाप होतात.

**कैकयीः** माझा चांगला विचार झाला आहे. आतां त्यांत बद्ल व्हावयाचा नाहीं. मागूं आतां?

**राजाः** प्रिये, हा मध्यान्हरात्रीचा समय, हीला पिशाचवेळ असें म्हणतात, तर आतां राहूं दे, उदयिक आंग धुवून शुचिर्भूत होऊन माग.

**कैकयीः** नाहीं, ती गोष्ट व्हावयाची नाहीं. देणें असेल तर आतां द्यावेत, नाहींपेक्षां मी कांहीं प्राण ठेवणार नाहीं.

**राजाः** (किंचित विचार करुन) मला ठाऊक आहे तूं ऐकायची नाहींस, तुम्हां सुंदर स्त्रियांना हट्ट अतिशय असतो. बरें माग, काय मागायचें तें.

**कैकयीः** पहा बरें, मग र र कराल तर मी ऐकायची नाही.

**राजाः** (घाबरुन आपल्याशीं) शिव शिव! भगवंता रघुकुलदेवता, हा कठीण प्रसंग तूंच निभावला पाहिजेस. ही इतकें बजावून सांगत आहे, तेव्हा तें माझें ह्यदय विदीर्ण करण्यासारखेंच असेल, यांत संशय नाहीं.

**कैकयीः** (राजास हातानें हालवून) कां, विचार कसला चालला आहे? माग म्हणा. आपणासारख्या सत्यप्रतिदय राजास असें भिणें योग्य नाहीं.

**राजाः** बरें, माग?

**कैकयीः** ऐका. एका वरानें, सांप्रत रामाला राज्याभिषेक करण्याकरितां जी सामग्री तयार केली आहे, तिनें माझ्या भरतास राज्याभिषेक करा, आणि दुस-या वरानें त्या मेल्या रामाला वल्कलें नेसवून चौदा वर्षेपर्यंत दंडकारण्यांत वनवास करण्याकरितां पाठवून द्या.

(हें ऐकतांच राजा मंचकावरुन धाडदिशीं जमिनीवर मूर्च्छित होऊन पडतो.)

**कैकयीः** अहाहा! असलीं ही सोंगें सारीं मला समजतात. इतकें मूर्च्छा येण्याजोगें काय मीं मागितलें? उठा. (असें म्हणून हातानें हालविते)

**राजाः** (सावध होऊन) काय मी स्वप्नांमध्यें आहे? किंवा माझ्या बुद्धीला विकार होऊन मीं भलतेंच ऐकलें व पाहिलें? (वर कैकयीकडे पाहून, गहिवरुन) छे छे, ही पहा! प्रत्यक्ष राक्षशीण! आपले विक्राळमुख पसरुन माझे प्राण गिळून टाकण्याकरितां बसली आहे!

**कैकयीः** महाराज, या काय पोरचेष्टा लाविल्या आहेत. मी मागितलेले द्यायचें असेल तर देतों म्हणा, नाहींतर नाहीं म्हणून पूर्वजांसह नरकात जाण्याला तयार व्हा.

**राजाः** (उठून) हा दुष्टे, कठोरह्यदये, पतिप्राणघातिनी, तुझें हे वज्रघाताप्रमाणें कठोर भाषण ऐकण्यापेक्षां माझे हे कर्ण बधिर झाले असते तर फार चांगलें झालें असतें. चांडाळणी, तुझें हें काळें तोंड ज्यानीं दिसत आहे ते हे नेत्र फुटून गेले अस्ते तरी मी सुखच मानलें असतें. सारांश, तुझ्याशीं मी संपर्क ठेवण्यापेक्षां मृत्यु येइल तर फार चांगलें होईल. (असें म्हणून निघून जाऊं लागतो.)

**कैकयीः** (त्याचा हात धरुन) महाराज, चालला कोणीकडे? आपल्या सत्त्वाची, शहाणपणाचे आणि धैर्याची ही परिक्षेची वेळ आहे. देतों किंवा नाहीं हें म्हटल्यावांचून मी आपणास सोडणार नाहीं. काय एका क्षणात मी आपणांस नकोशी झालें? (एकीकडे) आतां असें नाहीं उपयोगी.(उघड)

**पद** - ( नाही कोणीही ढुंगिले या चा.)

**एक क्षणभरिं जवळि न असले।**
**वाटे आपणा वर्षचि गेले॥**
**माझ्यावरिचें प्रेम कीं तसलें॥**
**काय लोपुनि गेलें सांगा॥1 ॥**
**माझें इच्छित सर्व पुरविलें॥**
**नाहीं कधींही निष्फल केलें॥**
**माझ्यावरिचें प्रेम कीं तसलें॥**
**काय लोपुनि गेलें सांगा॥2 ॥**
**मज निज छायेपरि वागविलें॥**
**स्त्रैण म्हणती तरि तें नच गणिलें॥**
**माझ्यावरिचें प्रेम कीं तसलें॥**
**काय लोपुनि गेलें सांगा॥3 ॥**

**राजाः** अशा रीतीनें तुझ्याशीं वागलों, त्याचेच हे उपकार फेडीत आहेस काय? कैकयी, इतकी बेफाम होऊं नको, परिणामीं तुला फार दु:ख होईल.

**कैकयीः** (संतापाने) असल्या पोकळ भीतीला भिणारी ही बायको नव्हे. मी सांगितलेलें वर आपण पूर्ण केलेंच पाहिजेत, नाहीपेक्षां आपल्या पायांशीं जीभ हासडून आतां प्राण देतें.

**राजाः** (आपल्याशीं) ही बोलल्याप्रमाणें करायला चुकायची नाहीं; कांहीं भलतें सलतें झालें तर उद्यांच्या मंगलकार्याला विघ्न येणार; तेव्हा सामोपचारानेंच घेतलें पाहिजे. (तिला आलिंगून पुन: मंचकावर बसवून) प्राणप्रिये कैकयी, हें काय बरें, आजपर्यंत निर्मल आचरणानें वागून अखेरीस असा हा कलंक काय म्हणून लावून घेतेस? तुझे दोन सोडून तीन वर पूर्ण करतो; पण मघाचे ते भयंकर शब्द पुन: उच्चारुं नकोस.

**कैकयी:** छे छे, ती गोष्ट कालत्रयींही घडायची नाहीं -

**पद** - (मोठा झिंजा वायु सुटला या चा.)

> **पडेल भूवरि तो ग्रहमाली॥**
> **वन्हि सोडे दाहकता अपुली॥**
> **चढतिल सागरही कुलशैलीं॥**
> **परि मम ही वाणी॥ न ढळे॥**
> **वज्रलिपीपरि बोलुनि चुकलें॥**

**कैकयी:** (त्याच्या हातून सुटून उभी राहून) वाहावारे शूरत्व! अरे दुर्दैवी राजा, वचनभंग करुन जें पातकाचें मंदिर उभारलेंस, त्यावर आतां निरपराधी स्त्रीची हत्या करुन कळस ठेवणार काय?

**राजाः** (संतापानें हात चोळून आपल्याशीं) वचनभंग! हाय हाय! काय करुं! या अघोरकृत्येनें कसें मला पेचांत पकडून टाकिलें आहे, यांतून धडपणानें सुटका होईलसे दिसत नाहीं. (उघड) कैकयी, तुझी इच्छा पूर्ण करितों, माझीही एक गोष्ट तूं ऐकली पाहिजे.

**कैकयी:** काय तें कळूं दे; ऐकण्यासारखें असलें तर ऐकेन.

राजा: पण आधीं तूं आपल्या जाग्यावर येऊन बैस, म्हणजे सांगतों.

**कैकयी:** (बसून) ही बसलें, सांग आतां काय तें.

**राजाः** हें पहा, या सिद्ध केलेल्या सामुग्रीनें भरतास राज्याभिषेक करवितों. पण माझ्या त्या रामाने वनवास करावा हा आग्रह सोडून दे. तो राज्यसंबंधी गोष्टीकडे कांहीं मन न घालतां मजपाशीं स्वस्थ राहील.

**कैकयी:** वा! इतकी मी भोळी नाहीं. भरताला राज्याभिषेक न झाला तरी चिंता नाहीं, पण त्या मेल्या रामानें चवदा वर्षपर्यंत दंडकारण्यांतच वास केला पाहिजे.

**राजाः** अग,हें कठोर मनाचे स्त्रिये, असा त्यानें तुझा काय अपराध केला आहे बरें? केवळ आपल्या अभाग्यामुळें या असंख्य जनांच्या तोंडात माती कां घालतेस? माझ्या रामाच्या सदगुणाचा स्वाद पूर्ण अनुभवून एक क्षणांत त्याचा तिटकारा तुला आला तरी कसा?

**पद** - ( रंगान्यारो निंगान्यारो या चा.)

**सुखचिदघन गुणनिःसीमा॥**
**अनुतापित सीतारामा॥**
**सकलांच्या अंतर्यामा॥**
**दवडिशि कां आत्मारामा॥ सुख॥धृ॥**
**मुनिमानसनेत्रविरामा॥**
**नवनीरदवर्णश्यामा॥**
**वसुधासौभाग्यललामा॥ दवडि॥**2 **॥**
**जननयनसुधामय सोमा॥**
**निःशेषित रक्षस्तोमा॥**
**रिपुदुःसह बलवद्धीमा॥ दवडि॥**3 **॥**

**कैकयीः** (त्रासानें) पुरे पुरे वर्णन. मला वाटतें, राज्य सोडल्यावर रिकामपणीं त्या मेल्या रामाच्या स्तुतिपाठकाचें काम आपणच करणार?

**राजाः** (दयेनें) कैकयी, नको अशी निष्ठुर होऊं. जसजसा तूं आपला हट्ट दृढ करुं पाहतेस, तसतसे माझे प्राण व्याकूळ होऊन जाऊं पाहतातग? कैकयी, मला रामाहून जगांत कांहीं प्रिय नाहीं म्हणून त्याच्या रक्ताची शपथ घेऊन सांगतों कीं जर त्याची नि माझी तूं ताटातूट केलीस तर मी एक क्षणभर देखील जिवंत रहाणार नाहीं बरें.

**कैकयीः** महाराज, असल्या भाषणांनीं मला कांहीं द्रव यावयाचा नाहीं, आपणांस सांगून ठेवितें. आतां सूर्योदय झाला कीं त्या सवतीच्या कारटयानें वल्कल परिधान करुन वनाला चालतें झालेंच पाहिजे.

**राजाः** अग ए राक्षसिणी, ज्याच्या उपहारासमयीं सुवर्णाच्या ताटांत षड्स पदार्थ भरुन मी पुढे, मी पुढें असें म्हणत शेकडो सुंदर स्त्रियांनीं धावत असावें; माझ्या हातून सेवा घडेल काय अशी इच्छा करुन आज्ञेची वाट पहात, हात जोडून असंख्य सेवकजनांनीं ज्याच्या आसमंताभ्दागीं तत्पर असावें; रक्तकमलाप्रमाणें आरक्त आणि नवनीताहून सुकुमार, अशा

त्या चरणाला त्रास होईल म्हणून जिकडे स्वारी हिंडणार तिकडे मखमालीचे रुजामे फरासानीं पसरीत रहावें, असा तो राजविलासी माझा राम, त्या दंडकारण्यांत एक घटकाभर तरी वांचेल काय?

**कैकयी:** वांचो नाहीं तर मरो. मला काय त्याचें. महाराज, बोलून बोलून माझें तोंड दुखून आलें. मला दिलेला वर आपण पूर्ण करणार कीं नाहीं, तेवढें सांगा म्हणजे झालें. उगीच असली रडकथा नको आहे.

**पद** - (पांडुनृपति जनक जया या चा.)

**कटु तव शब्दाहुनि॥ कंदफळें ती सेउनि॥**
**राहिल कां राम वनीं॥ सांग कैकयी॥**1 ॥
**अति तापद तुझ्याहुनी॥ चंडकिरण शिरिं साहुनी॥**
**राहिल कां राम वनीं॥ सांग कैकयी॥**2 ॥
**बघ तव चित्ताहुनी॥ कठिण शिलाशयनिं पडुनि॥**
**राहिल कां राम वनीं॥ सांग कैकयी॥**3 ॥

तर हे कैकयी, तुजपुढें हा पदर पसरुन भिक्षा मागतों. माझ्या प्राणजीवन रामाला वनाला पाठविण्याचा आग्रह सोडून बाकी हवें तें माग.

**कैकयी:** अरे जा चांडाळा! तूं कितीसा सत्यप्रतिज्ञ आहेस तें वरच दिसून आलें. काय तो राम मात्र तुझ्या पोटचा आणि भरत दुस-याच्या पोटचा झाला होय? म्हणून असा मघापासून रडत बसला आहेस! देणें असेल तर देतों म्हण. नाहीपेक्षां आपले काळें तोंड घेऊन निघून जा. पहा, उद्यांच्या एका दिवसात तुझ्या मिथ्या भाषणाचा झेंडा जर न नाचविला तर मी नांवाची कैकयीच नाहीं.

**राजाः** (अति दु:खानें) हाय हाय? झाला पूर्ण घात झाला! सुशीले, कौसल्ये, महापतिव्रते सुमित्रे, तुमच्या सौभाग्य मंदीराला या अधम स्त्रियेनें आपल्या हातानें अग्नि लावला, अग, हे जनककन्ये जानकी, तुझें सौख्याचें तारुं या कैकयीच्या अभेद्य ह्यदयपर्वताला आपटून बुडालें ग बुडालें. हे सदगुणभांडारा रघुकुलतिलका रामाचंद्रा, हा अधम चांडाळ महापातकी तुझा पिता केवळ भगलपंट झाल्यामुळें तुझ्या वनवासाला कारण झाला!

**कैकयीी :** कृतघ्ना, तुझी प्रसिद्धी होण्याला कारण मी असून माझे उपकार तूं विसरतोस काय? भार्गवरामानें एकवीस वेळां निःक्षत्रिय पृथ्वी करण्याचा निग्रह करुन आपला कठोर परशुचाप लववून सर्व क्षत्रिय निर्बीज केले त्यावेळीं हातीं कंकणें घालून स्त्रीवेष देऊन तुला मींच वाचविलें, स्वर्गलोकीं राक्षसांशीं युद्ध करीत असतां विरथ होऊन पळत जात होतास पण त्या समयीं यश:प्राप्ती मीच करुन दिली. शृंग्रऋषीला आणवून पुत्रकामेष्टी यज्ञ करा म्हणजे पुत्र होईल, असा वर माझें खिन्न वदन पाहून बृहस्पतींनीं दिला. सारांश, तुझ्या सर्व कीर्तीला आणि पुत्रप्राप्तीस मीच कारण असतां चांडाळा, मजशीं आणि माझ्या पुत्रांशीं तुझें असें आचरण काय? धिक्कार असो तुला.

**राजाः** (दीन मुद्रेनें)बरें तसें कां होईना. (हात जोडून) हे आदिमाये, जगदंबे, दशरथकुलदैवते, तुला मी शरण आहें, तर त्या माझ्या बहिश्चर बालरुपी रामाची आणि माझी ताटातूट करुं नकोस.

**कैकयीः** अरे निर्लज्जा, तूं माझा पति नव्हेस आणि मीही तुझी स्त्री नव्हे; हें पहा मंगलसूत्र तोडून टाकतें आणि तुझ्या नांवाचें कुंकूही पुसून टाकतें.

(मंगळसूत्र तोडते व कुंकूं पुसते.)

**राजाः** कैकयी, हे माझे शब्द शेवटचे बरें! पहा माझे प्राण, घुटमळु लागले, तर तुला दया येवो अगर न येवो - पहा जें मस्तक श्रीगुरुवसिष्ठचरण किंवा सर्वेश्वर यांवाचून कोठेंही लवलें नाहीं तें तुझ्या चरणावर ठेवून मी प्राणदान मागतों तर नाहीं नको म्हणूं. (असें म्हणून तिच्या चरणावर साष्टांग नमस्कार घालतो.)

**कैकयीः** (त्वेषाने) हा निर्बल्या, नपुंसका, षंढा, सार्वभौम राजा असून स्त्रीचे चरण धरितोस? आग लागो तुझ्या सत्वधीरपणाला. (असें म्हणून त्याच्या मस्तकावर लत्ताप्रहार करिते. राजा मूर्च्छित होतो. तोंच सुमंत व वसिष्ठ गडबडीनें प्रवेश करतात. सुमंत राजाला सांवरुन वारा घालून सावध करण्याचा प्रयत्न करितो.)

**वसिष्ठः** हरहर, काय प्रमाद हा! कैकयी, तुझ्या अघोर पातकाबद्दल आहेत हे नर्क पुरे नाहीत. त्या यमाला तुजकरता नवाच नर्क निर्माण केला पाहिजे.

**कैकयीः** राजाचे चारी पुत्र सारखे समजायचे असून त्या रामावर विशेष प्रीति करणाऱ्या पक्षपाती थेरडया तुझीही पण नव्या नर्कातच योजना झाली पाहिजे.

**वसिष्ठः** अग पापिणी, पृथ्वीपति म्हणजे विष्णुसमान तशांत तुजवर प्राणापेक्षां विशेष प्रीति करणारा तुझा पति त्याच्या मस्तकावर लत्ताप्रहार तुझ्यानें करवला तरी कसा?

**कैकयी:** थेरडया, तूं घंटा बडवून असावेंस, तें सोडून, राजा आपल्या स्त्रियेशीं एकांतांत असतांना तू येथें कसा रे आलास? (राजाला पाय लावून) अरे, हा लत्ताप्रहार सोसून उगीच नाहीं पडला. या वेळेस हा माझ्या वचनांत इतका सापडला आहे कीं; मी याचा प्राण घेतला तरी शोभेल.

**सुमंत**: (दु:खानें) हाय हाय! प्राण घेण्यांत आतां काय बाकी उरली आहे? गुरुमहाराज, आपण त्यांच्याशीं काय भाषण करितां. इकडे महाराजांची प्रक्रुति फारच भयंकर झाली आहे. हा प्रहर लोटेल असें मला वाटत नाहीं.

**वसिष्ठ:** (राजाची प्रकृति पाहून गहिंवरुन) राजाला या कालरुपी स्त्रियेनें ग्रासून, एका घटकेचा सोबती करुन सोडलें. शिव शिव! माझ्या रामाच्या कोमल अंत:करणास हा वज्रपाताप्रमाणें प्रहार कसा सोसेल कोण जाणे. अहो सुमंत, काय सांगूं? –

**पद** - ( अतिप्रतिरथ हा निष्प्रति या चा.)

**दोषास्पद परिक्षा समजुनि यांचा कुलगुरु होउनि आलों॥**
**निपजे नारायण रविवंशीं या आशेवर गेलों॥**
**पूर्ण सुखाचें धाम राममुख बघुनि शांत मी झालों॥**
**कैकयीहस्तें नृपघातातें बघण्या कैसा जगलों॥**
**आधि न कां मेलों॥ शेवटी सर्वथैव फसलों॥**1 ॥

**सुमंत**: (राजाच्या मुखाकडे पाहून) गुरुजी, महाराज शुद्धीवर आलेसें वाटतें. पहा नेत्र उघडून चहूंकडे पहात आहेत, कांहीं मनांतून बोलायचें आहेसें दिसतें. पण जीभ आडवी पडल्यामुळें नीट शब्दोच्चार होत नाहीं.

**वसिष्ठ:** (जवळ जाऊन दु:खानें) अरे, हे सत्यप्रतिज्ञ राजा, तुझी अशी ही दुर्दशा तुझ्या कुलगुरुनें पहावे कांरे! तुझें दिनकराप्रमाणें प्रखर तेज या कैकयीरुप राहूनें ग्रासून टाकिलें!

(असें म्हणून डोळ्याला वस्त्र लावून रुदन करितो.)

**सुमंत**: गुरुमहाराज, हें काय? ह्या वेळी ह्यदय अगदीं कठोर केलें पाहिजे. हा रवि तर अस्ताला चाललाच आणि आपणही धैर्य सोडलेत म्हणजे मग काय विचारायचे, सर्व अंधारच.

**राजा:** (सावध होऊन) राम! राम! राम! अंत:करणीं त्या माझ्या रामाचें सुख एकदां मला पाहूं द्या. गुरुमहाराज त्या श्रावणाच्या पितरांचा ‘तू पुत्रशोकाने मरशील’ हा उग्र शाप तेजोमय ढळढळीत अक्षरांनीं लिहिलेल्याप्रमाणें मला दिसत आहे. तर माझ्या रामाची नि माझी भेट करवा. (असें म्हणून पुन: बेशुद्ध होतो.)

**सुमंत:** हाय! हाय! पून: बेशुद्ध झाले. गुरुजी, आतां कसें करावें?

**वसिष्ठ:** आतां दुसरें काय करावयाचें आहे? तुम्ही लवकर जाऊन रामाला घेऊन या, मी याच्या प्रकृतीचें निदान पहात येथें बसतों.

**दिंडी.**

**रामाराज्या सुमुहूर्त काढियेला॥**
**तोचि त्याला वनवास हेतु झाला॥**
**परम मंगल मांडिलें कृत्य जेथें॥**
**अशुभ मूर्ती पातली कशी तेथें॥**1 ॥

# श्रीरामराज्यवियोग

## अंक 4 था

## प्रवेश पहिला

(सुमंत व दूत प्रवेश करतात.)

**दूतः** महाराज देखो यही प्रभु रामचंद्रजीका मंदीर.

**सुमंतः** जा, दूता आंत जाऊन वर्दी दे कीं+, मी महाराजांचे दर्शनासाठीं आलों आहे (दूत जातो.) कालचा दिवस आणि आजचा दिवस यांच्यामध्यें केवढें तरी अंतर हें! कालचा संध्याकाळचा सूर्य अस्ताला जातांनां दशरथ महाराजांच्या नांवाचा जयजयकार त्यानें ऐकला, आज उगवणा-या बाल सूर्याला श्रीमान प्रभू रामचंद्र महाराजांच्या नांवाचा जयजयकार ऐकावयास मिळणार! आणि यासाठीं त्याने रात्रीचे पाठीमागें तसदी लावूनच कीं काय आम्हाला रात्र केव्हां गेली हें सुद्धा कळू दिलें नाहीं. आम्हां अयोध्यावासी जनांचें केवढें तरी हे सदभाग्य. दशरथ महाराजांच्या पुण्याईनें आज हा रामराज्याचा सोहळा आमच्या दृष्टीस पडत आहे. इक्ष्वाकु कुलाचा आनंद वाढवणा-या राजा तूं धन्य आहेस! या पहाटेंच्या वेळीं हे रामचंद्र महाराजांच्या राजवाडयाभोवतीं फिरणा-या आनंदी लोकांचे थवेच्या थवे पाहिले व त्यानां जुन्या व नव्या राजाला धन्यवाद देतानां ऐकलें म्हणजे असे वाटते की, भरतीच्या वेळीं ऐश्वर्यमदानें फुगलेला समुद्र मोठमोठयानें धों धों करुन समुद्रसीमेवर जाऊन आदळत आहे. सर्व देशांतील लोकानीं गजबजलेली हे प्रती अमरावती झालेली अयोध्या नगरी नाना जलचरांनीं भरलेल्या समुद्राप्रमाणें वाटतें. अहाहा! काय ही मंदिराची शोभा. इंद्रभुवन या पेक्षां निराळें तें काय असणार? भारद्वाज पक्षाप्रमाणें हे बंदीजन अरुणोदय झाल्याची प्रभूनां वर्दी देत आहेत. (दूत येतो.)

**दूतः** सरकार पूछतें है के आपके वास्ते वर्दी की क्या जरुरत?

**सुमंतः** बरें, रथ बाजूला उभा कर. मी प्रभूदर्शन करुन आलोंच. (सुमंत जातो.)

**दूतः** (गेला असें पाहून) बाजूकू बोले तो कहां? इस नगरकू आज बाजू तो हैही नहीं. सब लोगों के भीड जैसा आदमीका दर्या बन गया है अहाहा! देखो हमारे होनेवाले सरकारके सब हाती, घोडे कैसे आनंद के मारे धूमधाम मचा रहें हैं. अहाहा! ये देखो, सरकारका मृत्युंजय हाती जैसे काले ढगों में लपेटे हुवे पर्वत के माफक मालूम पडता है. नाचो नाचो, खूब नाचो, के तुमारे अनदाता आज हमारे सबके अनदाता होनेवाले है.

**साकी.**

**नाच नाचके गौर तौरसे धूमधाम करते हैं।**
**आनंदसे ये हाती घोडे दुवादान करते हैं।**
**आपने मालिकको । होनेवाले राजाको॥1 ॥**

**प्रवेश दुसरा**

(श्रीराम व सीतादेवी दर्भासनावर बसलीं आहेत. स्तुतीपाठ चालले आहेत. पहारेकरी सुमंत आल्याची वर्दी देतो.)

**गद्य**

**वैतालिकः-**

**सार्वभौम यौवराजपद भूषवुनि॥**
**बलप्रबल दानव वधुनि कौशिकमख रक्षियले॥**
**बम्हकुलोत्पन्न भार्गव गर्व खंडुनि**
**नीलोत्पलदल पदीं सतीस उद्धरिलें॥**
**गुणगुणमंडित मांगल्यमूर्ती वैदेहिवरुनी॥**
**शिवचापा भंगुनी सुरासुरही तूं लाजविले॥**
**सुनिजन मानस पंजर शुक होऊनि**
**सकल जन मनीं अनभीषिक्त तूं राजा युवराज रामचंद्र॥1 ॥**

(जयजयकार युवराज महाराज)

**पद** - (चापधर कुमार हा याचा.)

**वीरवरः नतांगी अर्पि सुमनमाला॥धृ॥**

**राजरऋषी स्वरांनीं, अभिषेकुनि सिंहासनीं॥**
**जय नादा त्या ऐकुनी, स्वर्गलाभ हो मला॥**1 ॥

**रामः** देवी, तुम्हां सर्व आप्तेष्टांची हीं पुण्यवचनें माझ्याकडून ही जबाबदारी पार पाडोत. (देवीला नमस्कार करतो.)

**पद** - (काय सान मानसा याचा.)

**शांत दांत कालिकाही।**
**चारुगात्री देवताही॥धृ॥**
**त्रस्त जगां शांत करी. वधोनि रिपुमत्ता ही सदाही॥**1 ॥

(लक्ष्मण व निरोप घेऊन येणारे व जाणारे चोपदार वगैरे.)

**लक्ष्मणः** या उष:कालसमयीं मनाला किती आल्हाद वाटत आहे. तो आल्हाद या उष:कालसमयींचा असो कीं रामराज्याभिषेकाचा असो! आज या लक्ष्मणाच्या कधींहीं अनुभवाला न आलेला असा आल्हाद वाटत आहे खरा. शुद्ध आणि पवित्र भावनाच मनांत यावयाचा हा समय.

**पद** - (लावणीची चाल.)

**भासे नगरी शोभावान । जशी केतकी भरज्वान।**
**विसरती जीवभान । थाट बघोनिया॥धृ॥**
**रामराजाचा सोहळा । वनीं गातीही कोकिळा।**
**प्रातःकालीचीही वेळा । सर्व ध्याती मनीं॥**1 ॥
**सृष्टि जाई ही बहिरुन । आनंदानें ये महिरुन।**
**येती सूर गहिंवरुन । पूर्वे अरुणोदय पलीकडे॥**2 ॥

अशुद्ध मनें सुद्धा या पुण्यमय दर्शनानें शुद्ध होतात. अस्नात मनुष्य दवबिंदूंनीं आपोआप स्नात होतो. पक्षीगणांचें कुजन ऐकून आपणही असेंच काहीं तरी चिन्मंगलाचें

ध्यान करावें असें मनुष्यांच्या मनात येतें! मग आज तर माझ्या रघुनाथाला, रघुकुलतिलकाला राज्याभिषेक होणार. अरे हें बघ - (चोपदार येतो.)

सेनापतींना म्हणावें कीं, श्रीगुरुमहाराजांची तुम्हांला आज अशी आज्ञा आहे कीं, सर्व सैन्य स्वस्तिकाकार किंवा तुम्हांला वाटेल त्या इष्ट क्रुतींत राजवाडयाच्या दक्षिण भागाच्या पटांगणांत उभें करा. राज्याभिषेक झाल्यानंतर स्वारी थोडया वेळानें त्या बाजूला येणार आहे, तेव्हां नीट व्यवस्था ठेवा. (चोपदार जातो.) रामराज्याभिषेक होणार म्हणूनच कीं काय आज आमच्या या अयोध्या नगरीची निशाच नाहींशी झाली आहे.

**पद** - (वीर भ्रमरा या चा.)

**दिशा दिशांची निशा जाउनी । झाली जागृति खरी।**
**हंसते उषादेवी अंतरीं ॥ धृ ॥**
**लुब्ध भ्रमर हे जाति धांवुनि । प्रफुल्ल कमलावरीं ।**
**पाहुनी वृत्ति होत बावरी॥ चाल ॥**
**हे गुणिजन जैसे गुणाकडे धांवती।**
**ते प्रसन्न जनही राम मनीं वानिती।**
**ते मुनिजन तेथें रामशुभा चिंतिती ॥चाल ॥**
**सर्व चराचर आतुर झाले प्रभुला पट्टावरी।**
**पाहण्या चातक मेघापरी ॥1 ॥**

काल केव्हां म्हणायचें व आज केव्हां म्हणायचें याची सीमा रेषा या निशेनें नाहींशी केली! सर्व रात्रंदिवस एकच चाललीं आहेत असा भास होतो. जर नोकराला आहे म्हटलें तर पुन्हां एक निमिषमात्र विचार करावा लागतो कीं, आज हें बरोबर कीं काल हें बरोबर! कालाचें सुद्धां विस्मरण पाडणा-या माझ्या श्रीरामा - (चोपदार येतो.)

**चोपदारः** सरकार, सुमंतांची स्वारी अद्याप थोरल्या महाराजांकडून इकडे आली नाहीं.

**लक्ष्मण:** बरं जा. आल्याबरोबर मला वर्दी द्यायला ये. (चोपदार जातो) श्रीरामचंद्र महाराजांच्या राज्याभिषेकासाठीं कीं काय मघांचा सायंकाळचा मावळता सहस्त्ररश्मी आपले मळके कपडे टाकून, नवीन कपडे धारण करुन रामदर्शनासाठीं मोठया तत्परतेनें वर येत आहे. (चोपदार येतो.)

**चोपदारः** महाराज, गुरुमहाराजांची स्वारी सर्व ऋषी वर्गासह सिंहासनासनिध आली आहे; व ऋषी गणांनां आपआपलीं कामें समजावून देत आहे.

**लक्ष्मणः** हें बघ गुरुमहाराजांनां विनंती कर कीं, थोरल्या सरकारकडे सुमंत मघांपासून गेले आहेत ते अद्याप कांहीं आले नाहींत तर तिकडे मनुष्य पाठवावयाचा किंवा कसें तें विचारुन ये पाहूं! ( तो जातो.) त्या वृद्ध सुमंतानां, त्यातल्या त्यांत आमच्या गुरुमहाराजांनां तर असें झालें आहे कीं, एकदां रामराज्याभिषेक झाला कीं यांचा कुलोपाध्याय झाल्याचें सार्थक झालें. आमच्या कुळांत प्रभु रामचंद्र जन्मल्यामुळेंच या सर्वांनां असें वाटतें आहे. खरेंच आज माझे धाकटे भ्राते भरत शत्रुघ्न दोघेही असायला पाहिजे होते त्या बिचा-यांनां या गोष्टीची सारखी तळमळ लागेल कीं, तुम्ही आमच्या वांचून एवढा राज्याभिषेकोत्सव समारंभ केलात तरी कसा. त्यांचा प्रश्न बरोबर आहे! आज ते असते तर फक्त आम्ही, रघुवंशजानीच माझ्या श्रीरामावर छत्रचामरें उडविलीं असतीं. तो मान आम्ही दुस-या कोणालाही लाभूं दिला नसता. अरे सुमंत आलेका बघ. (चोपदार येतो.) आणि आले असले तर त्यांनां म्हणावें - पण तसें नको, मीच तिकडे आलों. (दुसरा चोपदार येतो.)

2 रा चोपदार: सरकार गुरुमहाराजांनीं असें सांगितलें आहे कीं, सुमंत आले नसले तर तिकडे ताबडतोब स्वार पाठवावा, व आपण प्रभूंनां व सीता माईंनां घेऊन इकडेच या! मी ऋषी ब्राम्हण मंडळीसह तुमची वाट पहात बसलों आहे. मुहुर्ताची घटका अगदीं भरत आली आहे.

**लक्ष्मणः** बरें जा. मातोश्रींना घेऊन मी आतां आलोंच म्हणून श्री गुरुमहाराजांनां सांग. (तो जातो) (दुस-यास) अरे हे बघ, सुमंतांनां पहाण्यासाठी थोरल्या सरकारांच्या वाडयाकडे जावयाची एखाद्या चपळ घोडेस्वाराला वर्दी दे पाहुं! अजून थोरल्या सरकारांनां घेऊन सुमंत कसे आले नाहींत. या मंगल प्रसंगीं चार घटका लवकर आले तर काय होतें - पण नाहींच तें - अरें मला श्रीगुरुमहाराजांच्या दर्शनाकरतां जावयाचें आहे. रस्ता दाखीव पाहूं.

### प्रवेश चौथा

(जान्हवी, तमसा व शरयू प्रवेश करतात.)

**तमसाः** सख्यानों आज एवढा राज्याभिषेक झाला म्हणजे आपल्या सीतादेवी महाराणी होणार नाहीं ग?

**पद** - (चाल कोकणीग वस्ती)

**शोभवि ग राणी। गुणखाणी।**
**शोभवी राज्याला राणी।**
**वेली विटपातें विपिनीं।**
**रोहिणी चंद्राते गगनी।**
**मनि वाखाणी ॥ गुणखाणी ॥1 ॥**
**चिंती पतितें दिनरजनीं।**
**भासे बाहुलि कीं नयनीं।**
**स्फुर्ती कविच्या नव कवनीं।**
**म्हणूं या गाणी ॥2 ॥**

**शरयुः** तमसे आज आपल्या सीतादेवी एकदां महाराणी झाल्या -

**तमसाः** म्हणजे काय करणार तूं? शरयू काय करणार तूं?

**शरयुः** अग घटकाभरानें एवढा राज्याभिषेक समारम्भ होऊन जाऊं दे म्हणजे मग सांगतें तुला काय करणार तें.

**तमसाः** अग घटकाभरानें कशाला? आतांच सांगेनास! आतां घटकेंत कांहीं इकडची सृष्टी तिकडे होत नाहीं!

**शरयुः** अग तसें नव्हे! आता राज्याभिषेक समारंभ एकदांचा झाला म्हणजे मग सांगतें! तोपर्यंत कुणाजवळ कांहीं बोलायचें नाहीं असे मी ठरवलें आहे.

**तमसाः** कुणाजवळ कांहीं बोलूं नकोस पण आमच्याजवळ सांगायला कांहीं हरकत आहे कां?

**शरयुः** अग तुझ्याजवळ सांगायला तशी हरकत नाहीं. तुला सांगतें एवढा राज्याभिषेक समारंभ उरकला कीं, मी एकदां मुद्दाम चांगलीं वस्त्रे नेसून त्या कैकयी आइसाहेबांच्या -

**तमसाः** इतक्यांत महाराणीसाहेबांच्या कैकयी आईसाहेब केल्यास वाटते. अग अभिषेक होईपर्यंत त्या महाराणीच आहेत हो! एक घटकाभर तरी दम धर.

**शरयुः** अग आतां तूंच म्हणालीस ना कीं घटकेंत कांहीं इकडची सृष्टी इकडे होत नाहीं म्हणून! एवढी घटका झाली कीं, सगळे अलंकार आणि चांगलीं वस्त्रे नेसून एकदां त्या कैकयी आईसाहेबांच्या दासींतून हिंडून येतें -

**तमसाः** म्हणजे काय होईल?

**शरय्यु :** व्हायचे काय आहे? त्या नकटयांचे एकदां नाक कापल्यासारखें होईल. काय मेल्या नाकानें वांगीं सोलत होत्या. स्वर्ग याना अगदीं दोन बोटें राहिला होता.

**तमसाः** अग त्यांना वाटे आपले थोरले महाराज स्वर्गात जाऊन लढाया वगैरे करुन आले आहेत, तेव्हां आपल्यालाही काय स्वर्ग फार झालें तर दोन बोटें.

**शरयुः** पण आतां त्यांचींच बोटें त्यांच्या डोळ्यांत घालावयाला मला मिळणार आहेत, आतां नकटया नाकानें वांगीं सोला म्हणावें. ती मंथरा तर काय बोलूंच नकोस -

**तमसाः** अग तिच्याविषयी कसें बोलणार तूं? ती तर काय धाकटया आणि आवडत्या महाराणीसाहेबांच्या माहेरुन आलेली! आल्या गेल्यांचा अपमान करण्यांतच तर तिला भूषण!

**शरयुः** अग हळू बोल.

**पद** - (चाल: पोरी हळू चाल.)

**शरयुः**
**सखे हळु बोल। कोणी ऐकेल।**
**गलगा नको करूं माझी गोष्ट नासेल ॥धृ ॥**
**काळ्या कुबडेचा राग माझ्य मनांतग ॥**
**नकशा उतरीन चौघां चारांतग ॥1 ॥**
**आतां थेरडीची मान माझ्या हातांतग ॥**
**बोलून हिणविन डौला डौलातग ॥**

तमसे आतां तिची अशी करतें? तिला म्हणावें ते माहेरचे वशिले विसर.

**तमसाः** होयग बाई! कुणाचें कांहीं काम असो, एकदां माहेरचा वशिला लागला कीं काम फत्ते. अग आपल्याकडे कोणी ढुंकून सुद्धां पहात नव्हतें.

**शरयुः** पण आतां म्हणावें कीं; कुणाला कामें करुन घ्यावयाचीं असतील तर या दासींच्याकडेच वळणें बांधलीं पाहिजेत. आम्हाला वाटला तर आम्हीं वशिला लावूं नाहीं तर -

**जान्हवीः** सख्यांनो चला आतां ओवाळण्याची तयारी करूं आणि आपण महाद्वारांत जाऊन उभ्या राहूं. (सीता येते.)

**सीता:** हें बघ शरयु, तू स्वारीची वाट पहात त्या पुढच्या सज्जावर जाऊन उभी रहा पाहूं. स्वारी आल्याबरोबर त्यांच्याकडे पहाण्याच्या आनंदांत मला वर्दी द्यायला विसरुं नकोस हो! (ती जाते.) तमसे मी प्रथम ज्या वेळीं तुमच्या यजमानांचे बरोबर अयोध्येंत पाऊल टाकलें त्यावेळीं माझ्या वडील जनांनीं माझ्याजवळ ज्या वनस्पती दिल्या होत्या, त्या तुझ्या जवळ आहेत ना?

**तमसा:** सरकार, त्या मी नीट ठेवल्या आहेत्.

**सीता:** जा त्या घेऊन ये पाहूं! (ती जाते) पारिजात पुष्पांची सुगंधाबरोबर जसा त्याला स्पर्श झाला असतां त्यांच्या नाशाची भीती झालें आहे कीं त्यामुळें दाशरथी प्रभूंना सिहासनावर बसल्याबरोबर त्याची जबाबदारी शिरावर घ्यावी लागली -

**राम:** जनककन्ये, काय सांगूं तुला -

**सीता:** काय वडीलमाणसांवर किंवा गुरुजनांवर काहीं संकट आले आहे का? कीं ज्याचें निवारण करण्यासाठीं स्वत: प्रभूंनां जावें लागणार आहे आणि त्यामुळें मला विरहांत पडावें लागणार आहे.

**राम:** वडील माणसांसाठींच जावे लागणार आहे, पण त्यांचा काल तूं समजतेस त्याच्यापेक्षांही किती तरी पटींने मोठा आहे.

**सीता:** वडिलांच्याकरतां खर्च होणारा काल माझ्या विरहापेक्षां जास्त महत्त्वाचा असल्यामुळें तिकडे प्रथम लक्ष देणें अर्थातच जरुर आहे. किती दिवस आपल्याला तिकडे घालवावे लागतील.

**राम:** देवी, ते दिवस नसून वर्षे आहेत.

**सीता:** वर्षे आहेत? किती वर्षे आहेत?

**राम:** चौदा वर्षे वल्कलें नेसून जटा धारण करुन मला त्या दंडकारण्य नांवाच्या भयंकर अरण्यात काढावीं लागणार आहेत.

**सीता:** हा राज्याभिषेक मला व्हावयांचा नसून माझ्या लाडक्या भरताला होणार आहे. आणि मला चौदा वर्ष दंडकारण्यांत काढावी लागणार आहेत.

**सीता:** राज्याभिषेक नाहीं आणि दंड्कारण्य काय म्हणून!

**राम:** विधीची घटना म्हणून.

**सीता:** आपल्या प्रत्येक शब्दानें मी गोंधळात पडत आहें. देवा, सांगा, सर्व हकीकत मला सांगा!

**रामः** ऐक पूर्वी माझ्या वडिलांनीं माझ्या कनिष्ट मातेला, कैकयी मातोश्रीला एका आणीबाणीच्या प्रसंगी त्या अत्यंत उपयोगी पडल्यामुळें दोन वर दिले होते.

**सीताः** बरें मग?

**रामः** ते दोन्ही वर मातोश्रींनीं महाराजांच्याजवळ आजच्याआज पूर्ण करुन मागितली आहेत.

**सीताः** ते कोणते?

राम: एका वरानें माझ्या राज्याभिषेकासाठीं जी तयारी झाली आहे त्याच तयारीनें भरताला राज्याभिषेक करावा व दुसऱ्या वरानें मी चौदा वर्षे जटा वाढवून, वल्कलें नेसून दंडकारण्यांत काढावींत. थांब, मनावर कोणत्याच विकाराचा अंमल होऊं देऊं नकोस. तूं विदेही जनकाची कन्या आहेस! वैदेहिला शोभण्यासारखें वर्तन कर.

**सीताः** देवा, मनाची थोडी तरी कालवा कालव अशा प्रसंगीं झाल्याशिवाय कशी राहील? आज आपल्या मस्तकावर या वेळीं हजार दलांनीं युक्त असलेल्या प्रफुल्ल कमलाप्रमाणें पांढरें स्वच्छ छत्र असावयाचें, त्याठिकाणी आपण म्हणत आहांत कीं, हें किरीट काढून जटा धारण करायच्या! अंगावर नाना प्रकारचे मौल्यवान अलंकार व किंमतीं वस्त्रें असायचीं त्या ठिकाणीं आपण म्हणतां कीं, वल्कलें धारण करायचीं! या माझ्या पृथ्वीपतीचा शब्द तरी ऐकायला मिळेल का? म्हणून लांब लांबून आलेल्या लोकांचे जिथे तूं, मी, चालायचें, त्या ऐवजीं आपण म्हणतां कीं निर्मनुष्य अशा भयंकर दंडिकेला जाण्याची तयारी करावयाची म्हणून आणि हें सगळे खरें? अर्थात आपल्याच तोंडून ऐकलें म्हणून खोटयाची शंका सुद्धा घेववत नाहीं, इतक्या अशक्य गोष्टी ऐकल्यानंतर् आपली आज्ञा की, मनाची चलबिचल होऊं देऊं नकोस म्हणून, हें स्त्री ह्यदयाला शक्य आहे का?

**रामः** देवी, मी जरी सिंहासनावर बसलों असतों तरी या गोष्टीचा सराव तुला करावयास पाहिजे होता! राजाच्या राणीनें आपल्या मनावर जर असे क्षणोक्षणीं विकार होऊं दिले तर ती सार्वभौमराजाची पटटराणी होण्याला योग्य स्त्रीच नव्हे, असें सर्व ज्ञाते लोक म्हणतील. असो. आतां माझ्या पश्चात मी सांगतों त्याप्रमाणें वर्तन कर! राजा भरतापुढें माझी कधीं स्तुती करुं नकोस, कारण वैभवशाली लोकांनां दुस-याची स्तुती आवडत नाहीं. म्हणून आपल्या दासी जनांपाशीं सुद्धां माझी आठवण काढून गुण गात बसूं नकोस. या वडिलार्जित सिहासनावर आतां तो बसणार आहे. तेव्हां राजाचे मनाप्रमाणें सर्वांनीं वागलेंच पाहिजे हा मुख्य धर्म आहे. तूं शहाणी आहेस! रडूं नकोस मन घटट कर. पहांटे उठून आपलें

नित्यनैमितिक झाल्यावर वार्धक्यानें व कृश झालेल्या माझ्या पित्याला आणि मातेला वंदन करुन त्यांची शुश्रुषा करीत जा. हा तुझा एक धर्म आहे. त्याचप्रमाणें माझ्या दुस-या मातांनांही वंदन करुन त्यांचा आशिर्वाद घेत जा. नोकर माणसांवर प्रेम ठेव! थोडक्यांत म्हणजे माझी कधीं तूं मर्जी मोडली नाहींस, त्याचप्रमाणे माझ्या पश्चात राजा भरताचीही मर्जी दुखवूं नकोस!

**सीताः** महाराज, आपण मोठे ज्ञाते आहांत! आपल्याला मी काय सांगावें! पण सर्व शस्त्रास्त्रांची माहिती असलेल्या एका वीरानें आपल्या पत्नीला असा उपदेश करावा? महाराज, कांहीं झाले तरी मला आपल्याबरोबर घेऊन चला! इथें मला एकटीला टाकून जाऊं नका.

**रामः** हे जानकी, तूं कुलीन असून धर्माकडे तुझें लक्ष आहे! माझ्या मनाप्रमाणें वागून तूं इथेंच धर्माचरण करीत रहा. देवी भलताच आग्रह धरुं नको?

**सीताः** देवा, आपण काय सांगतां हें मला? आईबापाच्या आज्ञेप्रमाणे देखील मला आपल्या पाठोपाठ यायला नको का? आपला वियोग झाल्यावर मी जिवंत तरी राहीन का? नव-याशिवाय बायकोला राहता येतें असे कुठें शास्त्र आहे?

**रामः** नको सीते भलताच आग्रह धरुं नकोस! त्या भयंकर वनांतील हाल तुझ्याच्यानें कसे सहन होतील?

**पद - (नभ मेघांनी आक्रमिलें या चा.)**

**मृगराजाचें आलय तें।**
**ज्ञानार्जन ज्यास्थलिं नित्याचि होतें।।धृ॥**
**निबिड भयंकर घोर कानांनीं।**
**मारूत वाहे स्वैर गतींनीं।**
**वन्यपशूंच्या हुकारांनीं।**
**जलौघ कारण तेतिं भयातें।**

म्हणून म्हणतों कीं उष्टयाजलाप्रमाणें राग आणि इर्षा टाकून दे आणि इथेंच रहा. हा भलताच आग्रह सोडून दे.

**सीताः** कौसल्यानंदना, कैकयीसासूबाईंच्या शब्दासाठी महाराज आपल्याला वनाला धाडतात आणि मी फक्त आपल्याबरोबर येतें म्हटलें तर आपण माझा प्रतिकार करतां? महाराज, हे शब्द आपल्यासारख्या वीराला शोभणारे नाहींत हो!

**पद - (मधमेशाम या चा.)**

**मजसि काय त्यजुनि जात। पद धरूनि विनति भरित।**
**हृदय मोद अखिल हरित। मजवरती कोप करित॥धृ॥**
**जनकसुता मी सहचरि। आत्मार्पण चरणिं करी।**
**विनवी ही दीनापरि। टाकुनि भय न्या वनांत॥1 ॥**

वनांतील संकटांच्या भीतीनें आपण मला दुस-याच्या हवालीं करुन चौदा वर्षे विरहांत पोळत ठेवणार? आई, बाप, भाऊ, मुलगा, सून हे आपआपल्या पुण्याप्रमाणें आपआपल्या भाग्यावरच रहातात, पण एका बायकोलाच मात्र नवऱ्याच्या भाग्याचें फळ भोगावयाचा अधिकार असतोना? त्यांना इहपरलोकीं एकटा पतीच काय तो गती देतोना? म्हणून म्हणतें देवा, मला आपल्याबरोबर त्या सुखधामाला घेऊन चला!

**रामः** देवी, मग तूं आपला हट्ट सोडीत नाहींस तर?

**सीताः** कसा सोडूं? आपल्या सारख्या वीर पुरुषांची त्या भयंकर वनामध्यें सेवा करणें मला भूषणाचें नव्हे का? रामचंद्र आपल्या तेजानें झळकत असतां सूर्याचें तेज सुद्धा फिकें पडतें असें लोक म्हणतात ते मला जर वनाच्या भयानें आपण बरोबर नेलें नाही, तर तें अज्ञानानें म्हणतात असेंच नाहीं का होणार? तपस्व्यांच्या तपश्चर्येला फळ येतें, मग माझ्या इतक्या दिवसांच्या साहचर्याला नाहीं का एवढें फळ येणार? आपल्या बरोबर असणें हा माझा स्वर्ग व आपल्या शिवाय दिवस काढणें हा माझा नरक? आतां शेवटचें सांगतें, इतकेंही सांगून आपल्याला मला नेणें जड वाटत असेल तर आपल्या विरहाच्या पहिल्या क्षणांतच मी या जगाचा त्याग करीन.

**रामः** देवी हा तुझा निश्चय पाहून मी आपला शब्द परत घेतला. माझ्या बरोबर तूं ही निघण्याची तयारी कर! आत्मज्ञानी मनुष्याला ज्याप्रमाणें दयेला सोडता येत नाहीं त्याप्रमाणें मला तुला सोडता येत नाहीं! जा, मी आतांच सुमित्रा आणि कौसल्या मातेचा निरोप घेऊन आलों आहें. तूं ही त्यांचा निरोप घेऊन ये, म्हणजे आपण बरोबरच महाराजांच्या दर्शनाला जाऊं आणि अभेद्य अशा कवचाप्रमाणें त्यांचा आशिर्वाद घेऊन सर्व गुरुजनांचा आप्तेष्टांचा व शेवटीं आपल्या मातेप्रमाणें असणाऱ्या या अयोध्यानगरीचा निरोप घेऊन शरयु नदीचें जल प्राशन करुन आपण आपल्या नव्या राजकारभाराला सुरवात करुं.

(लक्ष्मण येऊन एकदम दोघांनां वंदन करतो. त्याचे डोळे पाण्याने भरलें आहेत! राग अनावर झाला आहे.)

**लक्ष्मण:** (स्वगत) माझ्या रामभद्राला वनवास? अशक्य, हा लक्ष्मण जिवंत असेपर्यंत. (उघड) अयोध्येच्या महाराजांनीं व महाराणींनीं अगोदर माझ्या बरोबर राज्याभिषेकापूर्वी कराव्या लागणाऱ्या मंगलस्नानासाठीं चलावें! वेळ फार थोडा राहिला आहे. आजचा मुहूर्त वायां जातां कामा नये; अशी आपल्या आवडत्या सर्व प्रजाजनांची आणि माझी आपल्याला विनंती आहे.

**राम:** सौमित्रा, या वेळ्त तुझ्या चर्येकडे पाहिलें म्हणजे असें वाटतें.

**अंजनीगीत**

**मेघाच्छादित आकाशांतुनि। जलधर वाटे वृष्टि वरोनी।**
**जलमय सृष्टी टाकिल करुनी। क्षणमात्रे सारीं॥1 ॥**
**सहस्त्ररश्मी निज किरणांनीं। तन्मय असतां जीव पोषणीं।**
**वाटे जाळिल ठेवुनि अग्नी। क्षणमात्रें सारी॥2 ॥**

शांत हो. माझ्याकडे पाहून तरी क्षणभर शांत हो. विवेक कर.

**लक्ष्मण:** महाराज, आपल्या सर्व गुणांकडे द्रुष्टी देऊन आपल्यावर नजर टाकली म्हणजेच तर वृत्ति अशा अधीर होऊन जातात! महाराज, ते कांहीं असो. आपण आतां माझ्याबरोबर मंगलस्नानाला राजवाडयांत आलेंच पाहिजे.

**राम:** लक्ष्मणा, जा मी सांगतों तसें कर.

**पद** - (शृंगा ताडोनी या चा.)

**आत्मार्पण आतां सखया तातवचाकरितां होवो॥धृ॥**
**वास वनांतरिचा प्रिया तो मातृसुखापरता॥1 ॥**
**सुखशांती या वनवासाची राज्यभोग भरता**
**होवो मातृसुखाकरितां॥2 ॥**

ती राज्याभिषेकाची सर्व तयारी मोडून टाक, त्या अभिषेकासाठीं आणलेल्या जलांनींच मी तापसव्रत घेण्यापूर्वी व्रतस्नान करतों बाकी तें जल तरी मला काय करायचें आहे? त्यापेक्षां

माझ्या शरयुचें पवित्रजल किती तरी उत्तम! सर्व लोकांना थोपवून धरुन चांगल्या वेगवान घोडयांचा रथ पाठवून भरताला आणवण्याची व्यवस्था कर. उत्तम मुहुर्त पाहून त्याला राज्याभिषेक कर! आणि आपल्या वृद्ध पित्याला -

**लक्ष्मण:** काय करुं ते सांगा! तें सांगतांनां आपल्यासारखा सहृदय मनुष्यसुद्धां पाषाणहृदयी बनेल सांगा काय करुं ते? माझ्या वृद्ध पित्याला, माझ्या यावेळच्या मनाच्या स्थितीची कल्पना करुन काय करुं तें सांगा!

**रामः** लक्ष्मणा तू अगोदर शांत हो! या वीर वृत्तींनां जरा आवरुन धर पाहूं!

**लक्ष्मण:** म्हणजे काय होईल?

**रामः** लक्ष्मणा, या जगामध्यें धर्म श्रेष्ठ आहे. आणि सत्य नेहमीं धर्माच्या आधारावर आहे, हें लक्षांत ठेव. आपल्या वृद्ध पित्याचें वचन सुद्धां धर्माला अनुसरुनच आहे. आणि पित्याची आज्ञा मी मोडूं शकत नाही, तर तू क्रोध करुं नकोस आणि ही क्षत्रिय वृत्ती आपल्या पितृधर्माकरतां तरी सोडून दे.

**लक्ष्मण:** धर्माकरितां? तू सांगतोस हा धर्म आहे? क्षत्रियानें क्षात्र वृत्ती सोडून देणें हा धर्म आहे? तारुण्याच्या व संकटाच्या वेळीं दिलेले वर असा वैरासारखा प्रसंग साधून या सुमंगल समयीं त्या वृद्धांकडून बुद्धिभ्रंश करवून पूर्ण करुन घ्यायचे हा धर्म आहे? अशा प्रसंगीं मी धर्म वगैरे कांहीं पाहणार नाही! एक माझ्या रामभद्राला राज्याभिषेक झालाच पाहिजे!

**रामः** आणि त्यामुळें रघुकुलांत न घडलेलें पातक झालें तरी चालेल?

**लक्ष्मण:** रामभद्रा, जर कधीं काळी या जगांत रघुकुलाचा नाश झालाच तर त्याला कारण आपलीं हीं धर्म आणि शांती होतील? क्षात्रविद्येनें कुलाचा नाश कधीं होणार नाहीं! शांती शांती म्हणून धर्मानें आणि सत्तेनें आमचे असलेलें सिंहासन परक्यांच्या हातांत आम्हीं कधींही जाऊं देणार नाहीं.

**रामः** अखेर जगांत यापासून तुम्हाला काय मिळेल?

**लक्ष्मण:** शांती धरल्यामुळें तरी काय मिळणार? मी करतों हा जरी अपराध आहे, असें जगाला वाटलें तरी त्यांना बोट दाखवायला आमच्या कुळाचें अस्तित्व तरी या जगांत असेल, पण तूं सांगतोस तो मार्ग मात्र जर स्वीकारला तर आमचें अस्तित्वच मुळीं या जगांतून नाहींसें होईल असें निर्माल्य होऊन मिळवलेला धर्म मला नको!

**रामः** लक्ष्मणा, भरताला तूं अगोदर परका तरी कसा मानतोस? अरे वनांत राहणाऱ्या एक ऋषीनें धर्म माहीत असूनही आपल्या बापाच्या शब्दासाठीं प्रत्यक्ष गोहत्येचें पातक केले,

जगज्जेत्या परशुरामानें धर्म कळत असूनही पित्रुवचनासाठीं कुऱ्हाडीनें आपल्या आईचें मस्तक तोडलें. अरे प्रत्यक्ष आपल्या कुळांत सगराच्याच सांगण्यावरुन ना सागरांचा नाश झाला! असे दाखले असताना मी अधर्म कसा करुं? अरे सत्यस्वरुप धर्माकरितां, माझ्या पित्याकरितां मी पाहिजे तें करीन. आज बापाची आज्ञा पाळून तुला न आवडणारा असा हा मी नवीन धर्म प्रचारांत आणीत आहें असें समजूं नकोस! तेव्हा हे जे मी करीत आहें तें माझें कर्तव्य आहे. सिहासनासाठीं या कर्तव्यापासून पदच्यूत होणें माझ्याकडून कधींही होणार नाहीं.

**लक्ष्मण:** हो शांतिब्रम्हा, हें माझें धनुष्य, मी केलेलें दान आणि मला प्रिय असणारी वस्तु यांची शपथ घेऊन मी सांगतों की, माझें तुझ्यावर अगदी अंत:करणापासून प्रेम आहे. आणि अशा माझ्या प्रिय भ्रात्याला राज्याभिषेकाच्या ऐवजीं जर वनवास येऊं लागला तर तो टाळण्याकरतां मी सारें आकाशपाताळ एक करीन. पूर्वी कुणी केला नसेल असा पराक्रम करुन तुझा विरोध करणा-यांचा या जगांतून नायनाट करीन. इतकेंच नव्हे तर कैकयीच्या प्रेमामुळें जर राजा दशरथ तुझ्याविरुद्ध झाला तर त्याच्याशीं सुद्धा वैर करुन त्याच्या आजपर्यंतच्या सर्व पराक्रमांना मातीला मिळवणारा पराक्रम करुन त्याच्या पक्षांचा वावटळीसारखा धुराळा उडवीन. कोणती गोष्ट करावी कोणती करुं नये हें कळत असून सुद्धां आड मार्गाने जाणारा, तो गुरु कां असेना कोणीही असो त्याला शिक्षा ही झालीच पाहिजे. वारस हक्कानें तुझें हें असणारें राज्य कशाच्या जोरावर हे कैकयीला देऊं इच्छितात? तुझ्या माझ्याशीं वैर बांधून भरताला राज्य देण्याची त्यांची काय छाती आहे? रामा माझ्या या तुला वल्गना वाटत असतील पण तूं नुसता माझा पराक्रम पहा. वृद्धापकाळीं या स्त्रीलंपट होऊन कैकयीच्या नादीं लागलेल्या राजाला बघ मी कसा ताब्यांत घेतों तो! हें बाहू, हे धनुष्य, हे बाण, ही तलवार यांच्या काय मोळ्या बांधावयाच्या आहेत?

**राम:** वीरा तुझा हा पराक्रम तुझ्या कटया शत्रूला कबूल केला पाहिजे. पण तुझ्या या आवडत्या भावाकरतां तरी तूं आपला हट्ट सोड. आणि मला वनांत जावयाची परवानगी दे. आणि ज्या उत्साहानें माझ्या राज्याभिषेकाची तयारी केलीस त्याच उत्साहानें माझ्या वनवासाची तयारी कर.

**लक्ष्मण:** माझ्या रामराजा, काय सांगूं तुला? तूं मला परवांनगी देरे! अरेरे, इतक्या विनवण्या करुन सुद्धां तुला माझी करुणा येत नाही? तर माझी ही प्रतिज्ञा ऐक, यापुढें हा लक्ष्मण

केवळ रामाची सावली म्हणून या जगांत राहील, त्यानें आपलें स्वत:चें अस्तित्व आज प्रभूच्या चरणीं अर्पण केले. (त्याच्या पायावर मस्तक ठेवतो.)

**रामः** शाबास सौमित्रा शाबास (त्याला पोटाशीं धरतो.) माझ्या लाडक्या ही विधीघटना आहे! अरे असें नसतें तर या राज्याभिषेकसमयीं असा घोटाळा झालाच नसता. बरें आजपर्यंत कैकयी मातोश्रीनें माझ्यावर मुलांपेक्षां प्रेम केलें तिला आजच अशी बुध्दी कां व्हावी? अरे हें दैव! नाही पेक्षां ती सुद्धां राजकन्या असून गुणानें व स्वभावानें उत्तम असून तिला अशी बुद्धी कां व्हावी? अरे हा दैवाचा खेळ! या जगांत जें आपल्याला कळत नाही तें दैव प्राणीमात्राला कधीहीं टाळतां येणार नाहीं, मग तो कितीही प्रयत्नवादी मनुष्य असो तें दैव!

**लक्ष्मणः** काय सांगूं देवा! आजपर्यंत या दैववादावर माझा विश्वास नव्हतारे! समुद्राला थोपवणाऱ्या वेलेप्रमाणें जर तुझें आणि राज्याचें रक्षण करीन तर मरणानंतर वीराला मिळणारे लोक मला न मिळोत! साखळदंड तोडून अंकुशाच्या आटोक्याबाहेर गेलेल्या मस्त हत्तीप्रमाणे सुटून पळणा-या या दैवाला बघ मी माझ्या पुरुषपराक्रमानें कसा मागें खेचतों तें.

**रामः** पुरुषसिंहा, दैवाशीं असा झगडा करुन अखेर त्यालाच दोष देण्यापेक्षां तो मार्गच सोडून दिलेला बरा! अरे अजून दैवाच्या मनांत याही पेक्षां अधिक मोठे पराक्रम आपल्याकडून घडावयाचे असतील किंवा कदाचित ज्या करितां आपला जन्म झाला तेंच कृत्य आपल्या हातून पार पडलें नसेल. समुद्र जसा आपल्या तीरांशीं खेळतो तशीच ही दैवाचीही आपल्याशीं क्रीडा चालली असेल! किंवा कदाचित आपलें गुरुच्या आश्रमांत राजाला योग्य असणारें शिक्षण झालें नसेल म्हणून दैव कदाचित तें आपल्या हातून घडवित असेल! अपूर्ण तपश्चर्या पूर्ण केलीच पाहिजे.

**लक्ष्मणः** या दैवापेक्षां, देवा तुला मी शरण आहें! काय आज्ञा करावयाची असेल ती कर. मी तयार आहे.

**रामः** आतां आज्ञा नसून विनंती आहे कीं, मी आणि जनककन्या वनाला जाणार. आमची तयारी कर. तूं सूज्ञ आहेस. तुला जास्ती काय सांगावयाचें पण वडिलाना कधीं दुखवूं नकोस. कुणाजवळ रामाचें वर्णन करुं नकोस व कुणाजवळ भरताची निंदा करुं नकोस.

**लक्ष्मणः** देवा, क्षमा करा! माझा मघाचा निश्चय मोडतांना मला फार यातना झाल्या आहेत. त्यावेळीं मी जी प्रतिज्ञा केली तेवढी तरी शेवटास न्या.

**रामः** कोणती प्रतिज्ञा?

**लक्ष्मण:** हे दाशरथी रामा, मघांशीं मी आपणासाठीच प्रतिज्ञा केली होती पण आतांच्या आपल्या भाषणावरुन असें दिसतें कीं वैदेहीही आपणाबरोबर वनाला येणार आहे.

**राम:** होय. तिचा निश्चय झाला आहे तो कांहीं केल्या ढळत नाहीं.

**लक्ष्मण:** मग आतां रघुकुलाच्या इभ्रतीसाठीं तरी मला आपल्याबरोबरच यावयाची परवानगी द्या.

**राम:** म्हणजें काय?

**लक्ष्मण:** म्हणजें असें कीं, कैकयीचा हट्ट पुरविण्यासाठीं दशरथ राजाने आपला रामासारखा पुत्र वनाला धाडला व रामानेंही आपल्या आवडत्या सीताराणीचा हट्ट पुरविण्यासाठीं तिला वनवासासारख्या भयंकर दिव्यांत बरोबर घेतलें; राघवा, हें आपल्यावर तरी निदान स्त्री लंपटतेचें दूषण येऊं नये म्हणून तरी मला आपल्या बरोबर घेऊन चला!

**राम:** मग आपल्या वृद्ध मातापित्यांची शुश्रुषा -

**लक्ष्मण:** आपल्या भयानें तो भरत या सर्व गोष्टी लक्षपूर्वक करील.

**राम:** जशी तुझी इच्छा! मात्र या बाबतीत सुमित्रा मातोश्रींची व उर्मिलेची तुला संमती मिळविली पाहिजे.

**पद** - (निग्रहानुग्रही या चा.)

**रक्षणीं दक्ष ज्या लक्ष ठेविति सदा।**
**आप्तजन पत्नींहीं पूज्य माता तशा।**
**वंदि मातेप्रती मिळवुनी शुभवचा।**
**करिं झणीं सिद्धता आत्मकार्या आतां ॥**1 **॥**
**नरा त्याग जगतींस या देई शोभा महा ॥धृ ॥**
**शांतमुनी आश्रमी द्न्यनजल सेवुनी।**
**मुक्त दिव्यांतुनी होऊं वाहे। विप्रजन तोषवुनि।**
**सकल धन देऊनी। घेई आशीर्वचा आत्मकार्या आतां ॥**2 **॥**

अंक चवथा समाप्त

# श्रीरामराज्यवियोग

## अंक पाचवा

### प्रवेश 1 ला

(वसिष्ठ व सुमंत प्रवेश करतात.)

**वसिष्ठः** सुमंत हे काय झालें? तुम्हांला माझें त्यावेळचे भाषण असत्य वाटलें पण आता तर खरेंना कीं हें रामराज्य होइल तेव्हा खरें?

**सुमंतः**गुरुमहाराज, आज महाराजांना मघांशी प्रथम जागृत करायला मी जेव्हां गेलों व त्यांनीं खोल स्वरांत श्रीरामालाच इकडे आण म्हणून मला आज्ञा केली त्याच वेळीं ही गोष्ट माझ्या ध्यानांत यावयास पाहिजे होती. पण मला वाटले कीं, या राज्याभिषेकाच्या श्रमामुळें सरकारनां थकवा आला असेल व त्यामुळें असा स्वरांत फरक असेल! म्हणून मोठया आनंदाने त्या पुरुषसिंहाला जो आपल्या गुरुजनांच्या आज्ञेप्रमाणें सारी रात्र आपल्या कोमल अशा अर्धांगीसह उपोषण करुन दर्भासनावर ध्यान करीत बसला होता, त्याला मोठया आनंदानें बोलवावयास जाऊन घेऊन आलों त्यांना वाटलें कीं, आपल्या मातेला आपले कोड पुरवायचे असतील म्हणून तिकडेच बोलावलें असेल; पण इकडे येऊन पाहतों तों या नागिणीनें असा विषारी चावा घेतला.

**वसिष्ठः** पण काय हो, त्या कुलटेला ही गोष्ट राणीच्या मनांत भरवायला संधी तरी केव्हां मिळाली!

**सुमंतः** महाराज, या गोष्टीची मी चौकशी केल्यावांचून राहिलो असेन असे का आपल्याला वाटतें? या बाबतींत त्या सटवीला असें दैव अनुकूल झालें कीं, जसें यावेळीं कैकयीला. श्रीरामभद्रांनीं जो दासीपुत्र पकडून आणला होता त्याची आपल्यापुढेंच चौकशी झाली; त्यानें ही मंथरेच्या कारागृहाची शिक्षा ऐकली होती, तेव्हां त्याला रामभद्राचा सूड घ्यावयाची बुद्धी उत्पन्न झाली. त्यानें अन्न घेऊन जाणाऱ्या दासीचें काम करणा-या एका तरण्या आणि आळशी दासीकडून तें काम आपल्याकडे घेतलें व मंथरेची सुटका केली. आता दोघांनाही तुरुंगांत ठेवलें आहे, पण आतां काय उपयोग! विषारी बाण जखम करुन गेला खरा आतां चौकशीचा काय उपयोग कीं तो कुणाचा होता आणि कसला होता? मोहराला आलेल्या झाडावर अकालीं वीज पडली खरी आतां काय उपयोग?

**वसिष्ठः** सुमंत, काय सांगूं तुम्हांला या राघवाला राज्याभिषेक झालेला पाहून या कुलगुरुपदाचा त्याग करुन पूर्वाश्रमांत जाणार होतों;, पण ईश्वरानें माझी तेवढीही इच्छा पूर्ण

केली नाहीं. आतां चौदा वर्षे हा बंदीवास मला सोसलाच पाहिजे. केवढें माझें मनोराज्य -

**पद** - (जातसे पति सदनी या चा.)

**जीवमात्रा चकित करिती दैव घटना या पहा।**
**मृगजलाचा भास होई खेळ हा विधिचा अहा ॥धृ ॥**
**त्यागि असुनी धांवे कुलगुरुपद घ्यावया।**
**दैव पसरी कुटिलमाया वंचिलें मुनितेंही या।**
**पुसति सारे तापसीजन द्न्यन जाई तें लया ॥1 ॥**

**सुमंतः** बरें स्वारी एकटीच वनाला जाण्याचें वचन कैकयीला असूनही जनककन्या व सौमित्र कशासाठीं निघाले आहेत?

**वसिष्ठः** ज्याप्रमाणें पुरुषोत्तमाला पराक्रम आणि दया सोडतां येणार नाहींत त्याचप्रमाणें रामाला सौमित्र आणि सीता यांचा त्याग करतां येणार नाहीं.

**सुमंतः** गुरुमहाराज, या नागरिकांची समजूत कशी घालायची, ते तर हट्ट घेऊन बसले आहेत कीं, आम्हीही रामभद्राबरोबर हें नगर सोडून वनांत येणार.

**वसिष्ठः** काय करतील बिचारे! त्यांनां आतां या हटटावांचून दुसरा मार्गच उरला नाहीं, षडविकारांचा त्याग करुन एकादा तरुण संसारी जसा संन्यासाश्रम स्वीकारतो, तसा राम तुम्हांला सोडून जाणार आहे. केवढें हे व्यक्तीमहात्म्य कीं ज्यांच्यासाठीं सर्वांनाच सर्वस्वाचा त्याग करण्याची बुद्धी व्हावी?

सुमंत: तो जानकीपति मघांशीं आपल्या वडील जनांचा निरोप घेत घेत रस्त्यावरुन जात असतां त्याच्या मुखकमलाचें दर्शन घेण्यासाठीं कोण चढाओढ! ज्यांच्या मनाची कल्पना कीं, जो आतां सिंहासनाधिष्ठीत झाल्यावर आपला राजाधिराज होऊन आपणां सर्वाना सुखी करणार त्याच्याच बद्दलची अशी विपरीत बातमी ऐकतांच त्यांच्या मनाची काय स्थिती झाली असेल! त्या जन समुद्राच्या पोटांत झालेली कालवाकालव त्यांच्या मुद्रेवर व सुस्काऱ्या वरुन स्पष्ट दिसत होती! अहो जो राजमार्गावरुन चालला असतां चतुरंग सेनेच्या मध्यावर ज्याचा सूर्याप्रमाणें झळकणारा वेगवान रथ असायचा तोच आज त्याच राजपथावरुन पायीं चाललेला लोकांच्या दृष्टीस पडला! एखाद्या उदारधनिकाच खजिना लुटण्यासाठीं जसे दरिद्री लोक धावतात, तद्वत राजमार्गावर राम दृष्टीस पडतांच लोक धावूं लागले.

**वसिष्ठः** सुमंत, वार्धक्यांत आपल्या राजाची आणि ही आपली काय स्थिती झाली, या एकाच कृतीनें सर्व आयुष्यांत राजानें केलेली सत्कृत्यें नाहींशीं झालीं हो! कुलगुरु, कुलगुरु, इक्ष्वाकुकुलाचा कुलगुरु माझ्या रामचन्द्राचा ज्या कुळांत जन्म त्यांचा कुलगुरु, जगांत तोंड दाखवायला कुठें जागा राहिली नाहीं, ती सती कौसल्या काय करील! महाराजांच्या रोषामुळें कृपणाच्या ठेवीप्रमाणें जिच्या डोळ्यांच्या कोप-यांत अश्रु उभे असायचे तीच आज बिचारी धाय मोकलून हंबरडा फोडीत असेल. जिच्या उदरी रामचंद्र आला तिच्या दु:खाची कल्पना कुणाला करतां येईल? या राज्याभिषेकासाठी मी केवढी जय्यत तयारी केली? काश्यप, जाबाली, वामदेव, गौतम, मार्कन्डेय वगैरे ऋषीजन मला काय दूषणें देतील. पूर्वी आकाशांत वावरणा-या प्राण्यांच्या सुद्धां जो दृष्टीस पडणें कठीण तोच माझा रघुकुल तिलक आज राजपथावरुन पायीं चाललेला सर्वांच्या दृष्टीस पडला. सुमंत जा तुम्ही रामाला घेऊन जा, तोंपर्यंत त्या चांडाळणीवर माझ्या शब्दांचा काही उपयोग झाला तर पहातो! या मंगल अशा प्रात:कालीच बालसूर्याला राहूनें ग्रासून टाकलें. काय चमत्कार झाला पहा!

## प्रवेश दुसरा

(द्शरथ, कैकयी, नागरिक स्त्रिया, मागाहून वसिष्ठ, राम, लक्ष्मण, सीता, सुमंत प्रवेश करतात.)

**नागरिकः** राजा, मी व्रुद्ध ब्राम्हण माझा सारा जन्म ब्राम्हण कर्म करण्यांत गेलेला, तो आज आमच्या नेत्रानंदाला आमच्या रामचंद्राला राज्याभिषेक होणार म्हणून आज सूर्याला अर्घ्य द्यायचे सुद्धां विसरलों रें! साऱ्या जन्मांत माझ्या हातून एवढें एकच पातक घडलें -

**कैकयीः** म्हणूनच या हातावरचे झाडे या हातावर मिळत आहेत.

**दशरथः** राम, राम, माझी आजपर्यंतची पुण्याई संपली का? हे प्रजाजनांचे दु:खोदगार आणि माझ्या रामाचा विरह हीं मी कशीं सोसू? कैकयी, या बायकापोरांच्या हंबरडयांनीं तुझ्या ह्यदयाला करुणेचा पाझर नाहीं फुटत काग? अशी कशी माझी मान आपण होऊन मी या यमपाशांत अडकविली! माझा पराक्रम, माझें तेज या सर्वांचाच लोप कसा झाला? मी असा स्त्रीलंपट कसा झालों! सगळे कळत आहे पण कांहींच कसें वळत नाहीं? काय करुं -

**कैकयीः** वचनभंग कर!

**दशरथः** वचनभंग! वचनभंग! त्या शुक्रशक्तीने माझा अंत झाला असता तरी बरें झालें असतें! त्या तपस्वी शुक्राच्या त्या दैत्य एकत्र गुरुच्या शक्तीचा त्यावेळीं माझ्यावर कांहींच उपयोग झाला नाहीं. पण ती राक्षसी शक्ती या चांडाळणीच्या रुपानें आज असा माझा छळ करीत

आहे. हा दशरथ जिवंत असून सुद्धां नुसतें कलेवर होऊन पडला आहे, त्या राक्षसी शक्तीपेक्षां चांडाळणी तुझी शक्ती मला असह्य झाली आहे. शुक्रा, माझा असा छळ करायचा नव्हतास रे! एका स्त्रीकडून पतीचा वध आणि पुत्राला वनवास या गोष्टी घडविणें, हे तपस्वी दैत्य गुरो, तुझ्यावांचून दुस-या कोणाला शक्य होतें.

**नागरिकः** राजा -

**कैकयीः** महाराज, हा काय नगरांतला रस्त्यावरचा चौक आहे म्हणून इथें हे सर्व भणंग भिकारी जमले आहेत. कारणांवांचून त्रास! महाराज या गोष्टींचा बंदोबस्त आतांच्या आतां करा नाहींतर -

**दशरथः** हे उग्र देवते, या स्त्रीपुरुषांपैकीं कुणाच्या तरी पुण्याईला यश देऊन त्यांना आणि मला सुखी कर. त्या श्रावणाच्या वृद्ध पित्याचा शाप मला आतां आठवला. त्या वृद्धाच्या पुत्र दुःखाची कल्पना मला आतां प्रत्यक्ष आली. त्याचें तें दुःखाग्नीनें रखरखलेले शब्द आज माझ्या ह्यदयाला जाळीत आहेत.

**योजियला शर ज्या दुष्टानें।**
**त्या येवो मृत्यू पुत्रशोकानें॥**
**हाय, हाय, पुत्रशोक पुत्रशोक**

**सर्वलोकः** राजा -

**कैकयीः** खबरदार एक शब्द बोलून लुबरेपणा कराल तर

**दशरथः** फलपुष्पांनीं संपन्न झालेल्या झाडाच्या मुळांशीं तोडण्यासाठीं हात घातला म्हणजे त्या झाडाची जी स्थिती तद्वत माझी स्थिती झाली आहे. अगं आता काय करुं? तुझ्या चरणावर मस्तक सुद्धां ठेवले तरी तुला करुणा न येतां -

**कैकयीः** चला सर्व चालते होता इथून कीं, रक्षकांना बोलावून एकेकाला बंदिवास दाखवूं?

**दशरथः** त्यांच्या बरोबर मलाही बंदिशाळेत टाक! म्हणजे तू वाटेल तें करायला मोकळी झालीस! माझ्या मस्तकावर लत्ताप्रहार सुद्धां केलास?

**सर्वलोकः** कुणाच्या मस्तकावर लत्ताप्रहार?

**दशरथः** या दशरथाच्या मस्तकावर लत्ताप्रहार?

**सर्वलोकः** कुणी केला?

**कैकयीः** मी केला समजलां? आता ब-या बोलानें जातां कीं -

**नागरिकः** अरेरे सार्वभौम राजाच्या डोक्यावर लत्ताप्रहार (वसिष्ठ येतात.)

**वसिष्ठः** कुणी केला?

**नागरिकः** गुरुमहाराज, या स्त्रीनें आपल्या महाराजांच्या डोक्यावर लत्ताप्रहार सुद्धां केलान हो! या जगावर आलेल्या संकटांतून आपल्या उग्र तपश्चर्येनें आम्हां सर्वांना मुक्त कराहो! या एका स्त्रीनें महाराजांच्या मस्तकावर लत्ताप्रहार करावा.

**वसिष्ठः** अरेरे काय ऐकतों मी हें! कैकयी राजपत्नीं हे काय केलेंस? केवढा प्रमाद हा? तुझ्या या अघोर पातकाबद्दल आहेत तेवढे नर्क तुला पुरावयाचे नाहींत. तुझ्या त्या यमराजाला नवीन नर्क बनविला पाहिजे. अग पापिणी, राजा म्हणजे विष्णूसारखा, त्यांतून तुझ्यावर प्राणापेक्षाही प्रेम करणारा तुझा पती त्याच्या मस्तकावर तुझ्याच्यानें लत्ताप्रहार करवला तरी कसा?

**कैकयीः** थेरडया तूं घंटा बडवून असावेंस तें टाकून राजा आपल्या स्त्रीसह एकांतांत असतांनां तिथे यावयाला तुला कांहींच वाटलें नाहीं. हा लत्ताप्रहार उगीच नाही सोसून घेतला. माझ्या वचनांत तुझा राजा असा सापडला आहे कीं त्याचा मी जरी प्राण घेतला तरी शोभेल.

**वसिष्ठः** या हिच्या भाषणानें राग येण्याच्या ऐवजीं हा द्वापारयुगांतच कलियुगाचा भास होऊं लागला आहे! जा नागरिकांनो आपल्या वाड्यासमोर उभे रहा. माझ्याकडून मी होतील तेवढे प्रयत्न करुन पहातोंच आहें. यश मिळणें दैवाधीन! हे पाहून मला आश्चर्य वाटतें. (राजाजवळ जातो.) अरेरे सत्यप्रतिज्ञ दशरथ राजा तुझी अशी स्थिती तुझ्या कुलगुरुनें पहावी कारे, याचा प्राण घेण्यांत बाई आता काय बाकी ठेवली आहेस? काल रामभद्रासाठीं उदार मनानें सिहासनावरुन उतरते वेळीं माध्यान्हीच्या सूर्याप्रमाणें आपल्या तेजानें तळपणारा हा राजा एका रात्रीत तूं घटका दोन घटकांचा सोबती करुनं टाकलास, तेव्हां या सत्ययुगांतच कलियुग सुरु झालें असें मी म्हटलें ते अगदीं सत्य आहे. (सुमंत, राम, लक्ष्मण सीतेसह येतात.)

**सुमंतः** नाहीं गुरुमहाराज अद्याप कलियुग सुरु झालें असें कसें म्हणतां? आपल्या पतीसाठीं वनवास भोगायला तयार झालेली ही जनककन्या आणि या सौमित्राकडे पाहिलें म्हणजे अद्याप सत्ययुगांतच आहोंत अशी खात्री होते! श्रीरामचंद्र कुणाचें ऐकणार नाहींत ही खात्रीच होती! पण या दोघांनीं वनवासाला जाऊं नये म्हणून यांच्या मातांनीं शक्य तेवढी खटपट केली पण त्यांच्या एकच शब्द जिथें आमचा राम तिथें आम्ही.

**दशरथः** अरेरे रामा नको हा जीव! काय सांगूं गुरुमहाराज मला मृत्युची सुद्धां भीति वाटते आहे हो. कारण मी मरुन स्वर्गात गेल्यावर सर्व देव मला रामाचें कुशल विचारतील. त्यांना

काय सांगूं! रामासारखा पुत्र मी वनाला धाडला असें कळतांच ते मला नरकांत लोटून देतील!

**कैकयी:** आणि वचनभंग करुन वर आलों असें त्यांना सांगितल्यावर ते तुम्हांला मोठया सन्मानानें स्वर्गात ठेवून घेतील नाहीं?

**दशरथ:** हाय वचनभंग, वचनभंग, गुरुमहाराज काय करुं? मी अगदीं दीन झालों आहे हो!

**राम:** महाराज महाराज काय आपली ही स्थिती.

**पद** - (प्रीये पहा या चा.)

**महानगा! ह्रदयभंग कां करिसी देहार्पण मी करीं॥धृ॥**
**सूर्यवंशिं भूपमहा, माध्यान्हीं जणु रवि हा,**
**पसरुनि निज तेज पहा, अस्त्मानिं हा जरी॥1 ॥**
**उदयोन्मुख वंशजासि, देवो निज तेज राशि,**
**प्रिय होतो स्वप्रजेसि, आत्मा जणुं शरीरीं॥2 ॥**

आपणच जर असें करावयास लागलांत तर भरताला संभाळून घेऊन त्याच्याकडून राज्यकारभार कोणी करवावयाचा. आपला भरत अजून लहान आहे नाहीं!

**कैकयी:** रामा या लोकांच्या बोलण्याकडे लक्ष न देतां तूं आपला शब्द व आपल्या पित्याचा शब्द खरा करावयाला तयार झालास याबद्दल मला अभिमान वाटतो. बरें आतां वेळ घालवूं नकोस.

**राम:** मी मुळींच कालक्षेप करीत नाहीं. कालक्षेप करुन सत्याची वंचना माझ्याकडून होईल असें तुम्ही मुळींच समजूं नका. रघुवंशांतील सत्याकरितां मी वाटेल तें दिव्य करीन. मग याबद्दल मला सर्वस्वाचा त्याग या तारुण्यासुद्धां जरी करावा लागला तरी मी कधींही मागें घेणारा नाहीं. आपणा सर्व वडील जनांचा आशिर्वाद घेऊन मी निघतोंच.

**कैकयी:** पण रामा इतकेंच करुन तू आपला एक शब्द विसरलास असें वाटतें?

**राम:** तो कोणता?

**कैकयी:** तूं वल्कलें अद्याप धारण केलीं नाहींस?

**लक्ष्मण:** वल्कलें धारण करावयाचीं तीं ही अयोध्या सोडल्यावर की त्याचे पूर्वी?

**कैकयी:** त्याचे पूर्वी! रामा तुझा शब्द तुला आठवत असेल?

**राम:** आणि मी विसरलों असलो, तरी आपण आठवण केल्यावर ती मी धारण केल्यावाचून कसा राहीन? पण इथें वल्कलें -

**कैकयी:** मला हीच, अडचण मघाशीं वाटली आणि म्हणून मी मुद्दाम आणवून सुद्धां ठेवलीं आहेत? (आत जाऊन घेऊन येते.)

हीं घे वल्कलें. (वल्कलें त्यांच्या अंगावर टाकते.) (दोघेजण वल्कलें हातांत घेऊन त्यांना मस्तकावर धारण करितात.)

**लक्ष्मण:** श्रीरामा, या वल्कलांकडे पाहिल्याबरोबर मला श्रीगुरु विश्वामित्रांच्या आश्रमाची एकदम आठवण झाली.

**राम:** बाल्यांत मोठया आदरानें धारण केलेल्या या वल्कलांनां पाहून कुणाला पुन्हां बाल्याची आठवण होणार नाहीं? या वस्त्रांच्या इतकीं पवित्र वस्त्रें धारण करावयाला मिळाल्याबरोबर मन किती एकदम पवित्र झालें?

**सीता:** हीं वल्कलें कशीं धारण करावयाचीं याची मला माहिती नाहीं त्यामुळें मला थोडें गोंधळल्यासारखें होत आहे!

**कैकयी:** वनवासांत एकदां सवय झाली म्हणजे नाहीं तसें व्हावयाचें!

**राम:** लक्ष्मणा चला, या वाडयांतील देवतांचें दर्शन घेऊन येऊं. (जातात.)

**वसिष्ठ:** अग कैकयी, तूं अगदीं मर्यादा सोडलीस! राजाला फसवून आणखी आपल्या वचनाच्या बाहेर कशाला जातेस? शील झुगारुन देऊन तूं अगदी निलाजरी बनली आहेस! सीता नाहीं जाणार वनाला! रामाच्या जागीं ती राज्य करील. स्त्रीही आत्मस्वरुप आहे, असें शास्त्रवचन आहे, तेव्हां रामाच्या ऐवजीं आम्हीं तिच्याकडून राज्यकारभार चालवूं समजलीस!

कैकयी: अहो राजगुरु, राज्याभिषेक भरतालाच झाला पाहिजे असा माझा वर आहे.

**पद** - (पापिणी गे या चा.)

**पाहिन मी, दिधले जे वर पूर्ण करवुनि। पुनरपी॥धृ॥**
**भरता सिंहासनिं बसवोनी। आशा मनिंची।पुरविन॥1 ॥**
**वैधव्या प्रेमें आलिंगुनि। आशा मनिंची। पुरविन्॥2 ॥**

**वसिष्ठ:** दशरथ राजा, असा कसा रे या स्त्रीच्या जाळ्यांत फसलास? आपल्या राघवाला वल्कलें नेसून कारे आज वनाला पाठवावयाचें!

**सुमंतः** दैवा शाबास आहे तुझी! वस्त्रालंकाराच्या ऐवजीं या राजपुत्रांना वल्कलें! देवी जानकी सनाथ असून अनाथाप्रमाणें वल्कलें नेसणार?

**वसिष्ठः** हे जनककन्ये, लक्ष्मणा, रामा - (दशरथ उठतो)

**दशरथः** कुठें आहे माझा राम, कुठें आहे माझ्या जिवाचा विसावा! कुठें आहे माझा जानकी पती! (राम लक्ष्मण सीता येऊन पायांवर डोकें ठेवतात.) माझी दया येऊन भगवान विष्णुनें का तुम्हाला पाठविलें? तुम्हीं माझें काहीं इष्ट करण्याकरितां कां आलां आहांत? माझ्या रामाला -

**वसिष्ठः** राजा हा तुझा राम तुझ्यापुढें वल्कलें नेसून उभा आहे आणि हा प्राणापेक्षांही प्रेम करणारा त्याचा भ्राता लक्ष्मण आणि ही तुझी जनककन्या जानकी-

**दशरथः** हे बाळऋषिनों, या वृद्ध विषयी राजाला क्षमा करा! माझ्याकडून अपराध घडला आणि त्याचीं फळें तुम्हांला भोगावीं लागलीं. बरें लक्ष्मणा, जानकी तुम्ही हीं वस्त्रें कां धारण केलींत?

**वसिष्ठः** देहाला ज्याप्रमाणें हात त्याप्रमाणें हीं रामाचीं दोन्ही अंगे आहेत! हे पापी स्त्रिये अजून सुद्धां तुला करुणा येत नाहीं ना? आतां काय सांगावें तुला? अग ज्या राज्यांत राम नाहीं  तिथें काय? तसलें राज्य घेऊन तरी तूं काय करणार?

**दशरथः** गुरुमहाराज, रामाबरोबर लक्ष्मण जाऊं द्या! पण या जनककन्येला तो भयंकर वनवास कसा सोसणार? नाहीं हिला तरी जाऊं देऊं नका हो!

**वसिष्ठः** जानकी तूं हा जाण्याचा हट्ट का धरतेस? आपला राम गेल्यानंतर तुझ्याकडे पाहून तरी आमचे दिवस जातील. बाळ, आमच्या करतां तरी हा हट्ट सोड!

**सीताः** गुरुमहाराज, सभेंत बोलण्याचा मला धीर होत नाहीं! आपला शब्द आणि थोरल्या महाराजांचा शब्द मला ऐकावयालाच पाहिजे पण यांनीं वनाचीं दुःखे सोशीत असतांनां मला इकडे सुख कसें होईल? पती हेंच स्त्रीचें दैवत ना? बाप, भाऊ, मुलगा हीं सर्व मोजकेंच देतील, पण अगणीत देणारा पतीच ना? त्या पतीचा त्याग करुन मी कशी राहूं?

**वसिष्ठः** राजा, ही विदेही जनकाची कन्या आहे! सर्व राजांनां अशक्य असें पद तेंही जनकाने मिळवले! तो राज्यावर असून सुद्धा विदेही! मग अशा बापाला शोभणारीच कृती तिच्याकडून घडली तर नवल काय?

**रामः** गुरुमहाराज, मातोश्री, तात, सुमंत मी आपला आणि माझ्या या वृद्ध पित्याचा शब्द खरा करण्यासाठीं आतां जातों, मातोश्री आई आणि माझी सुमित्रा माता दुःख सागरांत

बुडालीं आहेत, महाराजांची तर ही स्थिती! अशा वेळीं यांची शुश्रुषा करुन सर्व प्रजेचें रक्षण करा! सुमंत, भरताला बोलावून राज्याभिषेक करवा. त्याला सांगा कीं वनांत जाण्याचे वेळीं तूं नव्हतास त्यामुळें रामाला फार वाईट वाटलें. त्याला या सर्व वडील जनांची काळजी घेण्यास सांगा. तसेंच राज्यकारभारांत जर त्याच्या हातून कांहीं चुका झाल्या तर माझी तुम्हाला विनंती आहे कीं, तो लहान आहे त्याला संभाळून घ्या. आणि शेवटीं मात्र त्याला सांगा, रघुकुलाला शोभेल असें राज्य कर! ब्राम्हणांचीं व ऋषींचीं कर्मे नीट चालावीं अशी काळजी घे! राजानें प्रजेला पित्याच्या ठिकाणीं सदैव जपलें पाहिजे, तो लहान तेव्हां त्याच्याकडून आमच्या कुलाला न शोभेल असें काहीं घडूं देऊं नका?

**सुमंतः** हे त्यागी महात्म्या, तर मग तूं आम्हाला दु:खसागरांत टाकून जाणारच.

**रामः** माझ्या जाण्यानेंच कदाचित सर्वांचें कल्याण होणार असेल म्हणूनच अशी विधिघटना घडून येत आहे. एकाचा त्याग कदाचित सर्वांचा उद्धार करायाला कारणीभूत होणारा असतो. मातोश्री येऊं. (सर्व नमस्कार करतात.)

**दशरथः** बाळा, अरेरे मला वेड लागेलसें वाटतें? सीता, राम, लक्ष्मणा तुम्हां सर्वांनां संभाळणें आतां देवा तुझ्याकडे आहे! लक्ष्मणा माझ्या रामाला सीतेला माझ्या शक्ती जात चालल्या रामा सीते आता भेट ( राम गुरुमहाराजाना वंदन करतो.)

**रामः** गुरुमहाराजांनी माझ्या नमस्काराचा स्वीकार करावा.

**दशरथः** गुरुमहाराज, माझ्या रामचंद्राला सीतेला लक्ष्मणाला वनापासून परावृत्त करणे तुमच्याकडून घडत नाहीं का?

**वसिष्ठः** (आनंदानें) राजर्षी दशरथा, तूं शांत ऐस! जें होतें तें नेहमी बऱ्याकरतां होत असतें! या मध्येंच तुझ्या कुलाचें नांव आहे. विरह सोसणें कठीण आहे, पण नाइलाज आहे. यांचा त्यागच आपल्या राज्याला वैभवाला चढवणारा आहे. त्यावाचून अशा महात्म्यांवर अशी वेळ येत नाहीं! त्यागाचें महत्त्व फार मोठें आहे. आणि तेंच देशाच्या लोकांच्या, कुलाच्या व्यक्तीच्या उद्धाराला कारणीभूत होणारें असतें! परमेश्वर या दिव्यांतून तुम्हांला पार पाडो. लक्ष्मणा सीते, या प्रसंगात धैर्यानें दिवस काढा! राजर्षी दशरथा, सावधान चित्तानें यांना निरोप दे!

**दशरथः** सावधान, सावधान, हे क्लेश माझ्याच्यानें सोसवत नाहींत. रामा - लक्ष्मणा - सीतारामा कौसल्यानंदना - रामा - या - रामा - या.(वसिष्ठ पुढें व्हा म्हणून सांगतात. राम,

लक्ष्मण, सीता जाऊं लागतात. स्वर्गातून पुष्पवृष्टी होते. व गंधर्वकन्या भरतवाक्य म्हणतात.)

**भरतवाक्य**

**पहा पहा काय सुंदर ॥ दिसे शोभा वीर नरवर॥**
**नंदिकेश्वर पृष्ठीवर॥ आरुढाला त्रिपुरांत कर हर ॥ पहा.**
**हेमघंटा नाद घणघण॥ दोहिं भागीं सर्वही गण॥**
**नंदि भृंगी धरिति वेसण॥ उडविती वर छत्रचामरें॥ पहा.**
**शंख दुदुभि डमरु वाजत। भूतांचा सरदार गाजत॥**
**आली स्वारी किती साजत॥ आज त्या बघतों नयनभरें॥ पहा.**
**नभीं दाटलीं सुरविमानें॥ पहाया तुज सम्भ्रमानें॥**
**कुसुम वर्षति अती मानें। बलवंता हर्ष निर्भर॥ पहा.**
**आकाशात पतितं तोयं। यथा गच्छति सागरं॥**
**सर्व देव नमस्कारं। केशवं प्रति गच्छति॥**